# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०५/१०/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक ०५/१०/२००६ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. ३०/०९/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंडोसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ८) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ९) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ११) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १२) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १४) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १५) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १६) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो. माझी स्थायी समिती पदासाठी बिनविरोध निवड केल्याबददल मी सर्व सन्मा. सदस्यांचे आभार मानतो. मी माझ्या सभापतीच्या कारकीर्दीमध्ये विकासाच्या कामांना प्राधान्य देईन. त्याकरिता मला आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. आपण सर्वांनी यापूर्वीच्या सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्या. त्याचप्रमाणे आताची सभादेखील खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी ही विनंती. आजच्या सभेला उपस्थित असलेले मा. उप-आयुक्त, सर्व सन्मा. सदस्य यांचे आभार मानुन आजच्या सभेचे कामकाज सुरु करावे अशी मी सचिवांना सुचना करतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती महोदय, मिटिंग सुरू होण्या अगोदर मी एक खुलासा करू इच्छितो की, विषय पत्रिकेवर विषय घ्यायला पाहिजे होता

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, तुम्ही कुठला विषय घेत आहात.

**रोहिदास पाटील :-**

मी मा. सभापतीसाहेबांना विचारु इच्छितो की, तुम्हाला विषय कोणत्या पद्धतीने दिल्यानंतर तुम्ही तो विषय सभागृहापुढे घेणार आहात ते सांगा. मी तुम्हाला दोन विषय दिलेले होते. ते दोन्ही विषय जिव्हाळ्याचे होते. तुम्ही या ठिकाणी ते दोन्ही विषय घेतलेले नाहीत. तुम्ही त्याबाबत सचिवसाहेबांना विचारा. एक विषय संतोष पाटील यांचा होता आणि दुसरा विषय होता रेल्वेने पुर्ण बॅरेकेट केले त्याचा होता. पूर्वेची माणसे पश्चिमेला येउ शकत नाही. त्यामुळे स्थायी समितीची सबवेसाठी हवी असलेली मंजुरी घेउन आपण आपले कामकाज पुढे चालवावे असे मी दोन विषय दिलेले होते. तुम्ही ते विषय घेतलेले नाहीत. विषय न घेण्यामध्ये काही कारण असेल तर तसे सांगावे किंवा विषय न घेण्यामध्ये काही पद्धत असेल तर ती सांगावी. तुम्ही आठ दिवस आधी विषय दिला नाही की, पाच दिवस आधी विषय दिला नाही तर आपण तसे पत्र देउ. आपल्यापैकी कोणताही सभासद तसे पत्र देईल किंवा जर तो प्रश्न जिव्हाळ्याचा असेल तर तो यायला पाहिजे ना.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की सन्मा. सदस्यांच्या अनुषंगाने प्रश्नाचा खुलासा करण्यापुर्वी मी विनंती करतो की या सभागृहामध्ये राज्यशासनाचे काही अधिकारी प्रतिनियुक्तीवर आलेले आहेत. आपण आपला खुलासा करण्यापूर्वी मी या अधिका-यांची सभागृहाला ओळख करून देतो. सर्वप्रथम नगर अभियंता श्री. मिलिंद वाणीसाहेब यांना मी सांगु इच्छितो की त्यांनी त्यांची ओळख करून द्यावी.

**मिलिंद वाणी :-**

मी श्री. मिलिंद वाणी. मी पूर्वी धूळे महापालिकेत कार्यरत होतो. मला आता शासनाने मिरा भाईंदर महापालिकेत पाठवलेले आहेत. मी इथे पूर्वी व्हिजिटला येवून गेलेलो होतो.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

श्री. सुधीर नाकाडी यांच्या जागेवर श्री. सुरेश बनसोडेसाहेब आलेले आहेत. त्यांनी त्यांची ओळख करून द्यावी.

**सुरेश बनसोडे :-**

शुभ प्रभात, सर्व स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांना माझे अनुवादन. माझे नांव श्री. सुरेश बनसोडे आहे. मी महाराष्ट्र शासनाच्या वृत्तलेखा सभेचा वर्ग-१ चा अधिकारी आहे. मी यापूर्वी मंत्रालयात अन्न नागरी पुरवठा, ग्रामविकास विभाग तसेच सहाय्यक संचालक या पदावर काम केलेले आहे. मी त्यानंतर उल्हासनगर महानगरपालिकमध्ये अडिच वर्षे मुख्य लेखा परिक्षक या पदावर कार्यरत होतो. माझी नेमणूक आता मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये झालेली आहे. तरी मी सर्वांना अभिवादन करून माझे दोन शब्द पुर्ण करतो.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे राज्य शासनाने श्री. रुन्दन राठोड नावाचे आरोग्य अधिकारी पाठवलेले आहेत. ते आता आरोग्य विभागाचे कामकाज बघण्यासाठी आलेले नाहीत. परंतु, येथे पूर्वी कार्यरत असलेले डॉ. बावसकर व डॉ. पडवळ यांची जी पोस्ट आहे. आपल्याला यांच्या ठिकाणी डेव्हलपमेन्ट करायची आहे म्हणजेच आपण हे पुर्वी दिलेले होते. दुसरा विषय असा आहे की सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांनी या ठिकाणी दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. रेल्वेच्या बॅरागेटींगबाबत कार्यकारी अभियंता त्याची माहिती देतील. तत्पुर्वी आस्थापनाशी संबंधित श्री. संतोष पाटील आणि इतर कर्मचाऱ्यांचा विषय स्थायी समितीच्या माध्यमातुन घेण्याबद्दल त्यांची विनंती होती. त्या अनुषंगाने संचिता तयार केलेली आहे. आम्ही तशी संचिता तयार करून स्थायी समितीकडे पाठवलेली आहे. त्याबाबत सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना मी सांगु इच्छितो की काल सविस्तर चर्चा झाल्यानंतर मा. आयुक्तसाहेबांनी येणाऱ्या डी.पी.सी. मध्ये त्यांचे वेतन फिक्सेशन करावे लागेल आणि ते मा. महासभेला कायम करावे लागेल असे त्याच्यामध्ये नमुद केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा विषय स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर मा. महासभेमध्ये जाणार आहे. हया विषयामध्ये जे आहे ते आमच्यासमोर यायला पाहिजे होते.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

कलम ५३ (अ) खाली आपण एखादया कायम पदाची मंजुर घेतो. तेव्हा ते पद मा. महासभेच्या मंजुरीने कायम करतो. आस्थापनेच्या कामकाजाचे अधिकार येत्या मा. महासभेमध्ये स्थायी समितीला डिलीकेट व्हायला पाहिजेत. म्हणजे पूर्ण अधिकार स्थायी समितीला यायला पाहिजेत. आपण आपल्याकडील प्रत्येक पॉवर डिलिकेट न झाल्यामुळे मा. महासभेकडे ऑफर करतो. त्यामुळे आपल्याकडे तो विषय डी.पी.सी.च्या बैठकीच्या मान्यतेनंतर येईल. काल तुम्हाला माहिती दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

माझा पहिला प्रश्न असा आहे की डी.पी.सी. म्हणजे काय?

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

आपली जी निवड समिती असते. त्या निवड समितीमध्ये संबंधित लोकांना त्या पदावर मान्यता घेउन रिकमेन्ड करावे लागेल.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या अशा कोणत्याही नियुक्त्या झालेल्या नाहीत.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडे श्री. संतोष पाटील आणि श्री. देविदास पाटीस असे दोन कर्मचारी गेल्या १४ वर्षापासून स्थायी स्वरूपात कार्यरत आहेत. परंतु, त्यांना कायम केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे एक श्रीम. मोघे नावाची बाई कार्यरत होत्या. मागच्या सभेमध्ये कोर्टाच्या निर्णयाच्या अनुषंगाने पुन्हा श्रीम. मोघे यांचा विषय घेतला. त्यामुळे त्याच धर्तीवर हे कर्मचारीसुद्धा कोर्टात गेलेले होते. परंतु, या कर्मचा-यांनी कायमपणाचे फायदे कोर्टाकडे मागितलेले नाहीत. या कर्मचा-यांचे निर्णय थोडे वेगळे झालेले होते. आपण त्या निर्णयाची अंमलबजावणी केलेली आहे. आपल्याकडे या कर्मचा-यांनी अर्ज केलेले आहे. आम्ही ते अर्ज आमच्या निवड समितीत अंतिम करून आपल्याकडे मंजुरीसाठी पाठवणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, त्या कर्मचा-यांनी एकदा नोकरीची अभिलाषा केलेली होती. मला नोकरी कोर्टाच्या आदेशाने द्या आणि ती नोकरी आपल्या सौजन्याने मिळावी अशी त्यांची अपेक्षा होती. प्रत्येकाला असे वाटते की मी रिटायर होईपर्यंत मला ती नोकरी पाहिजे आणि असे अभिप्रेत असते. कोर्टाचा आदेश झाल्यानंतर त्या कर्मचा-यांनी वेतनश्रेणी मागितली नाही, पदोन्नती मागितली नाही. परंतु, असे बोलणे खरोखर नियमाला धरून होईल का? की भावनात्मक होईल ते सांगा.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

या ठिकाणी भावनेचा विषय होत नाही. कोर्टाचा जो निर्णय झालेला होता. त्याबाबत त्यांनी कायमपणाची मागणी केलेली नव्हती. कोर्टाचा जो निर्णय झालेला होता. त्यावरुन त्या कर्मचा-यांनी डयु-देटला त्यांची वेतनश्रेणी फिक्स करुन एरियस रक्कमची मागणी केलेली होती आणि तेवढयासाठी त्यांचा कोर्टाचा निर्णय झालेला होता. महापालिकेने त्या पध्दतीने त्या निर्णयाची अंमलबजावणी करुन त्यांना फिक्ससेशन पगारावर आणि फरकारच्या रकमेसह सर्व अदा केलेला आहे. आपल्याकडे कोर्टाचा जजमेन्टसुध्दा आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुमची जी मागणी होती. तुम्ही त्याबाबतचे विषय का आणलेले नाहीत. तुम्ही ते विषय आणायला लावा. आपण त्याच्यावर नंतर चर्चा करुया.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटीलसाहेब, मला याच्या पलीकडे असे म्हणायचे आहे की जेव्हा श्रीम. मोघे बाईंचा विषय येतो. त्यावेळेला या सभागृहात श्रीम. मोघे बाईंचा विरोध करायचा की नाही हा नंतरचा विषय आहे. परंतु, आपण त्यांचा विषय त्यांच्या कोर्टाच्या आदेशानुसार या सभागृहात म्हणजेच स्थायी समितीमध्ये घेउ शकतो. परंतु, तुम्ही तो विषय आम्ही विनंती करुन सुद्धा का घेउ शकत नाही? मा. महासभेमध्ये मा. आयुक्तसाहेबांनी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही फक्त विषय घेउन या असे स्पष्ट उत्तर दिलेले होते. मी दुस-या दिवशी विषय घेउन गेलो. दुस-या दिवशी मा. आयुक्तसाहेबांनी स्वतः सांगितले की आम्ही काहीही करणार नाही. ते कर्मचारी १४ वर्षे काम करतात तर त्यांना सामावून घ्यायला पाहिजे. नंतर मी मा. उप-आयुक्तसाहेबांना भेटलो, सचिवसाहेबांना भेटलो. तुमचा स्थायी समिती सभापतीसाहेबांमध्ये अंतर वाढवायचा प्रयत्न आहे का? तुम्हाला काय करायचे आहे? मी त्यांच्यावर आरोप नाही.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही विषय समजुन घ्या.

**ज्युडी डिसोजा :-**

ते नविन आहेत.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

हा विषय आरोपाचा नाही.

**रोहिदास पाटील :-**

मग तुम्ही या कर्मचा-यांना न्याय द्यायला पाहिजे.

**बालाजी खतगावकर (उपआयुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापतीसाहेबांच्या सुचनेप्रमाणे पुढच्या सभेत विषय आणला जाईल.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेत हा विषय घेतला जाईल.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, रेल्वेबाबतसुध्दा माहिती दया.

**जयंत पाटील :-**

आम्हाला सबवेबाबत डिटेल माहिती द्या.

**रोहिदास पाटील :-**

आपला रेल्वेचा जो सबवे आहे. तुम्ही आता तो सबवे बघायला गेलेले होते की नाही ते मला माहित नाही. परंतु, आमच्या पूर्वेच्या माणसांना पश्चिमेला यायचे असेल तर त्यांची कमर मोडलीच समजा. ती माणसे बायका-मुलांना घेउन येउच शकत नाहीत. फार रेलींग पुढे जाते. आपण ह्याच्या-त्याच्यावरून उडी मारू शकत नाही. आपण सबवेचा विषय स्थायी समितीमध्ये घेउया. आपली परवानगी असेल तर किंवा एखादी नविन इस्टीमेट वाढत असेल तर तुम्ही हा विषय चर्चेला घ्या असे मी तुमच्या नावाने आणि सचिवांच्या नावाने पत्र दिलेले होते. आम्ही जे पत्र दिलेले होते. तोसुध्दा विषय आलेला नाही.

**मा. सभापती :-**

मी चर्चा करून विषय घेतो.

**हंसुकुमार पांडे :-**

सबवेका काम तो बहुत टाईमसे पास होके वैसेही पडा है। अपना प्रशासन अबतक करता क्या है? यह समझना जरुरी है। अभी वह रॅली इतनी दूर तक बाँधी है। पब्लिकको आने-जाने के लिये तकलिफ हो रही है।

**मा. सभापती :-**

मै सबवे का काम कर लूँगा।

**हंसुकुमार पांडे :-**

मगर सबवे की आजकी परिस्थिती क्या है?

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, सध्याची सबवेची परिस्थिती काय आहे? सध्याच्या सबवेच्या परिस्थितीबाबत कार्यकारी अभियंता यांनी सांगावे.

**दिपक खांबित :-**

मा. महासभेने रेल्वेचा सबवे बनवण्याबाबत मंजुरी दिलेली होती. आपण त्याप्रमाणे तो विषय रेल्वेकडे पाठवलेला आहे. सध्या तो विषय डी.आर.एम. कडे पेंन्डींग आहे. रेल्वेच्या सबवेचा विषय डी.आर.एम. कडून चीफ इंजिनियरकडे जाईल.

**हंसुकुमार पांडे :-**

या प्रोसीजरला किती टाईम लागतो?

**दिपक खांबित :-**

साहेब, या गोष्टीला वेळ लागतो. कारण तिकडे रेल्वे प्रशासन आहे. तिकडे म्युनिसीपाल्टी नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही म्युनिसिपाल्टीमार्फत सबवेसाठी कधी प्रयास केला का?

**दिपक खांबित :-**

प्रत्येक महिन्याला मिटींग असते. त्यामुळे आम्ही प्रयत्न करित असतो.

**हंसुकूमार पांडे :-**

परंतु, सबवेचा विषय कधीच आलेला नाही. पूर्वी सबवेचा विषय आलेला होता. त्याच्यानंतर तो विषय यायचा बंद झाला.

**दिपक खांबित :-**

सबवेला मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे.

**हंसूकुमार पांडे :-**

मा. महासभेने सबवेला मंजुरी देउनसुद्धा काम झालेले नाही.

**दिपक खांबित :-**

आपली सबवेबाबत काही प्रोसिजर आहे. त्या प्रोसीजरला वेळ लागतो. शिवाय, ते रेल्वेचे काम आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, तरीसुध्दा किती वेळ लागेल?ते सांगा.

**दिपक खांबित :-**

आणखी एक महिना लागेल. त्यानंतर तो विषय परत मा. महासभेमध्ये येईल.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, एका महिन्यात करुन घ्या. आम्ही तुमचे धन्यवाद करु.

**मा. सभापती :-**

याचा लवकर पाठपुरावा करावा.

**रतन पाटील :-**

भाईंदर पश्चिमेला जाणाऱ्या लोकांचा प्रश्न आहे. म्हणून लवकरात लवकर पाठपुरावा करण्यात यावा.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, माझ्या म्हणण्याप्रमाणे बबन स्वामी म्हणून जेसल पार्कला आहेत. ते त्याचा फॉलो अप जास्त करतात. ही सत्य परिस्थिती आहे का? आपलं प्रशासन नक्की कुठे कमी पडते. ते मिटींग घेता इकडे इंजिनियर पण आलेले ही सत्य परिस्थिती आहे. आपलं प्रशासन मा. आयुक्तांकडून कमी पडते. त्याचा पण खुलासा व्हायला पाहिजे. जास्तीत जास्त तो इंजिनियरला आणतो.

**रोहिदास पाटील :-**

माझे तारीख पत्र आहे. पत्र आहे....

**शशिकांत भोईर :-**

काका, आपण पत्र दिले आणि आता आपला विषय घेतला नाही. म्हणजे आपण जेव्हा फॉलो अप करणार तेव्हा पत्र होईल पत्र दिले म्हणून विषय आला असे समजून पण काका फायदा नाही.

**जयंत पाटील :-**

बबन स्वामी जेव्हा ॲक्टीव्ह पणे काम करत होते तेव्हा आपण प्रशासन झोपलेले का? आमची कमजोरी कुठे आहे?

**हंसुकूमार पांडे :-**

प्रशासन को शहर के बारेमें फिकर नही है।

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही प्रशासनाला विचारा परत, टेम्पो तिकडे का गेले?

**हंसुकुमार पांडे :-**

खाली टॅक्स जमा करनेका, पब्लीक को परेशान करने का? पब्लिक के लिये कुछ करना है। ऐसा कुछ प्रशासन देखता ही नही।

**एस. ए. खान :-**

टॅक्समध्ये आपले जे सूट देतात. कॅश कोणी भरणारे असेल तर त्याला पण सांगता पूर्ण कॅश भरा. नंतर तुम्हाला सूट देणार हे कशी काय पद्धत आहे.

**हंसूकुमार पांडे :-**

भरोसेका कल अगर प्रशासन से नही होता है तो शरम की बात है।

**एस. ए. खान :-**

कॅश भरायचे आहे. रोकड भरायचे आहे तर सूटचे पैसे कापूनच घ्या ना. ते म्हणतात पूर्ण पैसे भरा.

**हंसूकुमार पांडे :-**

मा. आयुक्त साहेब, बबन स्वामी करता है और प्रशासन नही कर पा रहा है। तो वो तो हमारे लिए शरम की बात है ना। जो लोग फॉरवर्ड करता है। पेपर फॉरवर्ड करता है उसके पिछे सब वे के लिये पडता है। तो हमलोग नही कर पा रहा है। प्रशासन नही कर पा रहा है इसका मतलब क्या है?

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

मी तुम्हांला खुलासा करतो. आता, कार्यकारी अभियंता ने खुलासा केलेला आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

ना वो नगरसेवक है, ना वो कोई कुछ है। फिर भी उसके पेपर पे काम होने लगा। तो फिर हमलोग क्या कर रहे है?

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

आपण मा. सभापती साहेबांच्या अध्यक्षतेखाली सर्व पक्ष शिष्ट मंडळ घेवून आपण रेल्वेला व्हिजीट करु. त्याची एक डेट निश्चित करु.

**हंसुकूमार पांडे :-**

व्हिजीट करु. पण, आपल्याला एक वर्षाच्या वर जास्त झालेले आहेत.

**मा. सभापती :-**

आपण शिष्ट मंडळ घेवू. ठिक आहे.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

घाईघाईने आपण शिष्ट मंडळ घेवून जावू आणि त्यांच्याशी चर्चा करु.

**एस. ए. खान :-**

आणि टेम्पोबद्‌दल पण खुलासा करा.

**हंसुकुमार पांडे :-**

अभी तकलिफ यही है की, लोगों को ईस्ट मे से वेस्ट मे जाने के लिए तकलिफ है। रेली को इतना दूर तक लगाया है। साहेब, ते लवकरात लवकर करुन घ्या.

**एस. ए. खान :-**

साहेब, टेम्पोबद्‌दल सांगा.

**जयंत पाटील :-**

मा. कमिशनर साहेब, काय झाले की आपण स्थायी समितीमध्ये ठराव केला. त्यांना हटवायचे. ठराव मंजूर झाला. आणि असे असताना सुद्धा त्यांना तुम्ही पोलिस संरक्षण देतात. त्यांना बाहेर काढले, हकलले. तेव्हा बाजार होता. जेव्हा आपण ठराव केला तेव्हा बाजार नव्हता. अशातला भाग नाही. मग, अधिकाऱ्यानं त्या बाजाराचा विचार का केला नाही की, इकडे बाजार बसतो इकडे आम्ही कसे ठेवायचे आणि त्या विशिष्ट ठिकाणी ठेवा. असे आम्ही कधीच बोलतो नाही. आम्ही कुठे बोललो की, बाजाराच्या ठिकाणी ठेवा.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

त्यामध्ये आम्ही मा. सभापती साहेबांकडे बैठक घेवून सर्व विभाग प्रतिनिधीला हे करुन की परमनन्ट तिथून कसे हटवले जातील. आणि तिथल्या ज्या गैरसोयी आहे. त्या दूर केल्या जातील.

**एस. ए. खान :-**

कधीपर्यंत ते नक्की सांगा ना.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ह्यांची अजिबात बाजू घेउ नका, तुमच आमच काही वाकड राहणार नाही. ह्यांच आमच राहिल. आपण ही जी सभा चालवतो. या सभेत जे चाललेले आहे. त्यातली एग्झिक्युशन ची जबाबदारी तुमच्याकडे आहे. त्यादिवशी आपण डेंग्यूचा विषय काढला होता. आम्ही मा. महासभेत विषय काढला. मा. आयुक्त साहेब, आमच्यावर लगेच प्रेशर आणतात. डॉ. पडवळ यांना सुद्धा दाबायला लागले. उत्तन मध्ये तीन केस झाले डेंग्युचा आपला काय प्रयत्न आहे? काय नाही? काम चालू आहे. म्हणजे काय काम चालू आहे? माणस इकडे मरायला

लागली. आपल्या प्रक्रीया काय आहे. ह्याची काहितरी निवेदन व्हायला पाहिजे. तुमचे १९ पानाचे सातव्या महिन्याचे हे इतिवृत्तांत आहे. पाटील साहेब, तुमचे ह्याच्यात मोठे भाषण आहे. काहितरी एक्झिक्युशन करायची जबाबदारी आहे की नाही. की, ज्या सभेच्या इतिवृत्तांताला मंजुरी देणार आहोत. कोणते अधिकारी त्याचा पाठपुरावा करून आले. की, मा. सभापती साहेब, बोलावतील, आम्ही येणार, बोलणार आणि निघून जाणार अशी जर स्थायी समिती चालणार असेल. जर तुम्ही जबाब कोणाला विचारणार. तुम्ही तरी इतिवृत्तांत वाचून आला असेल तर ह्यातच एकतरी काम ह्याच्यात तुम्ही जेवढे दोन - अडीच तास बोललात. त्यातल काम एकही झालेले नाही पाटील साहेब. सन्मा. सदस्य रतन पाटील यांचे भाषण आहे. तुमचे भाषण आहे. पाटील मॅडमच भाषण आहे. ते प्रश्न जिव्हाळ्याचे आहेत आणि त्याच्यासाठी ही स्थायी समिती आहे.

**मा. सभापती :-**

माझ्या जागी मी तस करू देणार नाही. तुम्ही घाबरू नका.

**रोहिदास पाटील :-**

मी अधिकाऱ्यांना विचारतो. तुम्हाला विचारत नाही. तुमचा ह्यात काही दोष नाही. मा. आयुक्त म्हणून तुम्ही जेव्हा बसता तेव्हा तुमच्या संबंधित अधिकाऱ्यांनी काहीच काम केलेले नाही. हे इतिवृत्तांत तुम्ही वाचा. ह्या इतिवृत्तांताशी माझा काहीच संबंध नाही. आम्ही त्यावेळेला नव्हतो. म्हणून मी इतिवृत्तांत वाचतो. त्यातले एकही काम झालेले नाही.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

त्यावेळेला पण काहीच झाले नाही असे हे आम्ही मान्य करू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी एक उदाहरण देतो. आम्ही स्टँडींग मध्ये डिसाईड केले की, जे समांतर आकारणी होती त्याची मुदत आपण नोव्हेंबर पर्यंत वाढवूया आपण सगळ्यांनी ठरवले. साहेब, त्याचे काय केले? दुसरे साहेब, समांतर आकारणीचे तुम्ही ते प्रपोजल पास केले आणि एक्सटेंन्शन नोव्हेंबर पर्यंत दिले आणि कमिशनर ते रिजेक्ट करतात? कशामुळे ते रिजेक्ट करतात?

**मा. सभापती :-**

रिजेक्ट कशाला केले?

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

त्याच्यामध्ये ते काम वैधानिक प्रोसिजरने आपण मा. महासभेच्या मान्यतेने लिमिट काढून नोटीफिकेशन केले होते आणि त्या अनुषंगाने त्याची जी कारवाई झाली होती. तीचा अहवाल आपण स्थायी समितीमध्ये इम्पलिमेंटेशन म्हणून सादर केलेले होते. जे कामकाज आपण केलेले आहे त्याची सभागृहाला माहिती व्हावी आता एज्युकेशनचे जे अधिकार आहे ते स्थायी समितीला आहे म्हणून तो अहवाल आम्ही कार्यालयात सादर केला होता. तो अहवाल सादर करताना सन्मा. सदस्यांनी ह्याच्यामध्ये काही चर्चा करून मुदत वाढवावी अशी अपेक्षा व्यक्त केली होती. पण ते सर्व अधिकार मा. महासभेचे आहे. स्थायी समितीने परत डायरेक्शन देणे हे मा. आयुक्त साहेबांना कायद्याच्या दृष्टीने बरोबर वाटलेले नाही. त्या विषयाची मा. महासभेत चर्चा झाली. परत एक्सटेंन्शन द्या म्हटले तर काही अंमलबजावणी करायला हरकत नाही. उद्या कोणी आक्षेप घ्यायला नको आणि आज मी तीला कारवाई झाल्यानंतर मी माहिती घेतली. फक्त अजित पाटील साहेबांकडे सहा अर्ज प्रलंबित आहे. त्याचा जो रोष आहे तो पुर्ण संपलेला आहे. आपल्याकडे जर असे कोणी आलेला असेल. त्यावेळेस सुद्धा आम्ही बोललो होतो की, त्यांना आपल्याकडे अर्ज तरी करायला सांगा. फक्त सहा अर्ज आहे. ते काम आपण विशेष कायद्याखाली केलेला होता. परत त्याला प्रोसिजरनेच करावे लागेल. म्हणून मा. आयुक्त साहेबांनी त्याच्यावर निर्णय घेतलेला आहे की, ते करता येत नाही. तसा आजपर्यंत काही वेगळा निर्णय केलेला नाही. त्यांचे गांर्भिय विभागाच्या लक्षात आले तशी जर मागणी केली तर आम्ही मा. महासभेत अजून प्रस्ताव देवू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही घेतले पाहिजे ना. तुम्हाला मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, हा मा. महासभेचा विषय आहे. तर तुम्ही हा विषय परत मा. महासभेमध्ये घ्यायला पाहिजे. आता, मा. महासभेचा अजेंडा निघाला.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

त्या अनुशंगाने मी खूलासा केलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे. पण आता, मा. महासभेचा अजेंडा निघाला त्याच्यामध्ये तुम्ही हा विषय घेतला पाहिजे होता. भरपुर अर्ज प्रलंबित आहे. आमच्याकडे अर्ज प्रलंबित आहे. तुमचे प्रभाग अधिकारी संजय दोंदे यांच्याकडे सुद्धा किती अर्ज प्रलंबित आहेत. पुर्ण इमारतीचे अर्ज पेंडींग पडलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, चुकीचे रिपोटिंग करू नका. आपण सगळ्यांसाठी काम करतो.

**मा. सभापती :-**

तुम्ही ते अर्ज बघा आणि चौकशी करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आमच्या भाईंदर पश्चिमेला भरपुर अर्ज पेंडींग पडलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही विषय वाढवलेले नाही. मुद्याचे बोलायचे आणि मुद्याचे उत्तर द्यायचे आम्ही मुद्याचे बोलतो.

**मा. सभापती :-**

मुदत वाढवली होती ना. मग मा. आयुक्त साहेबांनी असे कसे रिजेक्ट केले.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

ठिक आहे. त्यामध्ये काही तपासून जर आवश्यकता भासली तर त्याप्रमाणे कारवाई करू. कोणालाही वंचित ठेवले जाणार नाही.

**जयंत पाटील :-**

आपल्या म्हणण्याप्रमाणे जर धोरण ठरवायचे असेल तर मा. महासभेत विषय घ्या ना.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी तसे निर्देश दिलेले आहे की, स्थायी समितीने केलेली सुचना मा. महासभेपुढे ठेवून मंजुरी घ्यायची. जर तुम्ही सांगितले की, ह्याच्यात विषय बसणार नाही. त्याच्यात विषय बसणार नाही. तर विषय वाढणार.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. हा विषय मा. महासभेत घेवून टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की, आता संपुर्ण शहरामध्ये कचरा आहे. आम्ही सहन किती करायचे. प्रत्येक नगरसेवकांनी तुमची बाजू घ्यायची. आम्ही कन्सल्ट करायचे की, आता कचऱ्याचा डंपिंग ग्राउन्ड नाही. जागा अव्हेलेबल नाही. साहेब, आम्ही तुम्हाला सहकार्य करायचे पण किती? काय लिमिट आहे की नाही? आज लोक आमच्या ऑफिस पर्यंत, घरापर्यंत येतात. आम्ही तुम्हाला किती सहकार्य करायचे?

**शशिकांत भोईर :-**

साहेब, हे खेदाची गोष्ट आहे. दसरा सण हा हिंदू लोकांचा होता. त्या दिवशी रस्त्याला एवढी घाण पडलेली होती ना आणि त्यानंतर पाउस पडला बी.पी. रोड, केबीन रोड, खारी गाव रोड हे पूर्ण पाण्यानी भरला होता. ही साफ सफाई आहे. ही जबाबदारी नगरसेवकाची आहे की मा. आयुक्त साहेबांची आहे. प्रशासनाने ह्याचा खुलासा करावा. साहेब, ही आमची जबाबदारी नाही. आपण त्या कचऱ्याची विल्हेवाट लावायची. आम्ही आपल्याला मंजुरी दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, काकांनी तुम्हाला प्रशासनाचे गलथान पणाचे उदाहरण दिले आता मी तुम्हाला दुसरे उदाहरण देतो. फॉरेस्टच्या जागेवरून आपल्या कचऱ्याच्या गाड्या गेल्या. तिथे प्रायव्हेट प्लॉट आहे. त्या फॉरेस्ट वाल्यांनी अडवले. आपले डंपर सगळे पकडून नेले. तर ते जे प्रकरण होते ते आम्ही आणि नाईक साहेबांच्या मध्यस्तीने सॉल्व्ह केले आणि आपल्या प्रशासनाला ती जागा पाहिजे होती तेव्हा प्रशासन हे गणेश नाईक साहेबांकडे का गेले नाही? आपल्या पालक मंत्रीकडे का गेले नाही? वरून प्रेशर का नाही आणले? साहेब काल मंत्रालय मिटींग मध्ये गणेश नाईक साहेबांनी सांगितले की, असा असा प्रॉब्लेम आहे. आम्हाला फॉरेस्टमध्ये जागा द्या. नाईक साहेबांनी ताबडतोब जागा दिली. दोन महिने हे लेट झाले. जर त्याच दिवशी झाले असते तर काय बिघडल असत.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

आम्ही तेव्हापासून अप्रोचमध्ये होतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही अप्रोचमध्ये कधी असता? तुम्ही अप्रोच कधी केला ते सांगा? आणि तुम्हाला रिसपॉन्स का नाही भेटला ते सुद्धा आम्हाला सांगा?

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

त्याचे उपायुक्त येतात. त्याची माहिती मी तुम्हाला देतो. कालच्या बैठकीमध्ये तो मुद्दा आम्ही तुम्हाला बोलायला लावला. ह्याच्यामध्ये वेगळ टाकण्याचे काही नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे काम तुमचे आहे ना.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

असे नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आमचा तुमच्यावरती हा आरोप आहे की, तुम्ही सांगता हा मुद्दा सांगायला सांगितला आणि तुम्ही आम्हाला का नाही भेटले? आणि आम्ही वेळ घेतली होती. शेख साहेबांना विचारा शेख साहेबांनी मिलिंदला फोन केला होता आणि सांगितले तुम्ही वेळ घ्या तेव्हा आम्ही वेळ घेतली होती.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

सन्मा. सदस्यांना मा. सभापती महोदयाच्या वतीने आश्वासीत करू इच्छितो की मा. मंत्री महोदयांना कोणीही प्रशासन अधिकारी डायरेक्ट बोलू शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आम्ही आहोत ना.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

लोकप्रतिनिधीच्या माध्यमातुन बोलायला लागते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मग तुम्ही का नाही बोललात.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

लोकप्रतिनिधीला आम्ही प्रशासनाकडून अवगत केला होता की, उद्याच्या बैठकीत अशी अशी अडचण आहे. फॉरेस्ट खात्याची जी अडचण आहे ती दूर करावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही वेळ घेता.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

आम्हाला अशी भुमिका घेवून चालणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही राजकुमार कांबळे यांना विचारा अजिज शेख साहेबांना विचारा त्यांनी सांगितले होते की, आम्ही जनता दरबारामध्ये १० ची वेळ घेतली होती आणि एकही तुमचा ऑफिसर आला नाही. तर काय करणार आम्ही? तुम्ही दोन महिन्यातुन आज हे डिले केले हेच जर तुम्ही अगोदर केले असते तर गणपती, नवरात्रीमध्ये कचरा साफ झाला असता.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

दोन महिन्यामध्ये आपली किती साईड बदलली ही कल्पना आपल्याला आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

१००% कल्पना आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

ती चुक कोणाची?

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाने डिले केला.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

जागा बदलल्या गेल्या.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी टायमिंग युज का केले नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, ही तुमची चुकी आहे.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही तुमची चुकी सांगत नाही की आमची चुकी झाली.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही जागा बदलली तो तुमचा लूक आउट आहे.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

शासनाने आपल्याला दिलेली जागा ही खुप चांगल्या प्रकारची जागा आहे. त्याठिकाणी सर्व 'क' शासनाचा प्रस्ताव अंतिम केलेला आहे. तिथे गटनेत्याची व्हिजीट केलेली होती. तो प्रस्ताव परवा मा. महासभेमध्ये मान्य केलेला आहे. ती कारवाई मोठ्या प्रमाणात प्रगती पथावर आहे आणि त्या कारवाईला पूर्ण रूप येण्याच्या अनुषंगाने अजुन चार पाच महिने मिरा भाईंदर वासियांना प्रशासनाला थोड सहकार्य करावे लागेल.

**हंसुकुमार पांडे :-**

प्रशासनाला कसे काय सहकार्य करणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, किती महिने, एक महिना, दोन महिने, तीन महिने, चार महिने किती महिने गेले सहा महिने झाले.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

कालच्या बैठकीमध्ये रस्त्याचा मार्ग फॉरेस्ट जागेचा मिटण्याच्या स्तरावर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आमचा हा प्रश्न आहे की, तुम्ही अगोदर का केले नाही?

**जेन्वी आल्मेडा :-**

आरोग्य विभागातर्फे आपण जी फवारणी करतो. त्या फवारणीची टाईम टेबल जर तुम्ही सांगितल तर बरं.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, विषय डायव्हर्ट होतोय. तो विषय नंतर घ्या.

**जेन्वी आल्मेडा :-**

इथे काय सांगतात की, फवारणी रोजची होते. कुठे होते. त्याचा टाईम टेबल आहे तो द्या ना. साहेब, आपल्याला सहकार्य कसले पाहिजे.

**एस. ए. खान :-**

साफसफाई केली नाही. डेंग्यु होणार. दिल्लीमध्ये आणि भारतात डेंग्यु पसरलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही आम्हाला सांगा की, आम्ही तुम्हाला सहकार्य कधी केले नाही? तुम्हाला प्रत्येक वेळी सहकार्य केले सहा महिने आम्ही थांबलो.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

सहकार्य केले. आपण जे टेम्परररी साईड निवडलेल्या त्याठिकाणी अप्रोच चे प्रॉब्लेम आहे. थोड्या संबंधित प्रभागाचे जे काही सदस्य आहेत. त्याच्या लोकप्रतिनिधिला व्हॉइसला तिथे अर्थ असतो आणि थोडीफार आम्हाला मदत केली तर खुप मोठ्या प्रमाणात शहरवासियांची गैरसोय दुर होतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्याकडे पॉवर आहे. जो सदस्य तुमच्या कचऱ्याच्या आडमध्ये येतो. तुम्ही त्याला सरकारी कामकाजामध्ये अडथळे आणतो. तर तुम्ही त्याला अरेस्ट करू शकता. बरखास्त करू शकता.

**एस. ए. खान :-**

मा. उपायुक्त साहेब, मागे मी जनरल बॉडीमध्ये सांगितले होते. तो जर अडथळा आणतो तर त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करा असेच साईन करणार म्हणजे पूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये डेंग्यू पसरू देणार नंतर मग सांगणार. मिरारोडला पण डेंग्यूचे दोन तीन पेशन्ट सापडले.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, सतत नागरिक आमच्याकडे भांडत असतात की, ही तुमची काम आहेत. आमची कामं नाहीत आम्ही प्रशासनाला प्रत्येक वेळी सांगत आलो की, कचरा उचला. नाहीतर आम्हाला गाड्या नेवून उचलायला लागेल.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. तुम्ही खुलासा करून द्या.

**एस. ए. खान :-**

साहेब जागा बदलले तर तो तुमचा लूक आउट आहे.

**अजिज शेख :-**

आपण जे सांगता. ह्या एक ते दोन महिन्यामध्ये आपण सहा ते सात जागा आपण बघितलेले आहेत आणि प्रत्येक ठिकाणी आपण कचरा टाकायला सुरवात केली की, त्या ठिकाणी तिकडच्या नागरिकांकडून प्रॉब्लेम निर्माण केले जातात. त्यामुळे आपल्याला जवळ जवळ सहा ते सात जागा आजपर्यंत बदलायला लागलेल्या आहेत. आता एक जागा आपण चेनाकडे बघितलेली आहे आणि त्यांच्या मालकाने तशी परवानगी सुद्धा दिलेली आहे. फक्त मध्ये फॉरेस्ट डिपार्टमेंटची जागा थोडीशी येते आणि त्याच्या संबंधात त्यांनी त्याला जो विरोध केलेला होता. त्याच्या संबंधात त्यांनी मिटींग आता साडे बारा वाजता कॉल केलेली आहे. तर आम्ही आता तिकडचे निघालेलो आहोत.

**एस. ए. खान :-**

तिकडे एक फायनल होईल का?

**रोहिदास पाटील :-**

जी जागा दिसते ती तुमची असे तुमची भुमिका होते का? तुम्ही सहा सात जागा निवडल्या.

**अजिज शेख :-**

नाही. आपण त्या लोकांच्या परवानग्या घेतल्या होत्या. त्यांच्या जमिन मालकाची सुद्धा परवानगी घेतली होती. परंतु, लोकल जे लोक आहेत त्यांचा विरोध होतो. प्रत्येक ठिकाणी हे होत चाललेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

बोलून चालून आता दसरा गेला. नवरात्र गेली. आता दिवाळी चालून जाईल. दिवाळी नंतर कचरा घेवून जाणार का? तुम्ही काल कचरा उचलण्या साठी तुम्ही एकच डंपर दिलेला का? एका डंपरच्या तीन फेऱ्या आहेत.

**अजिज शेख :-**

काका, आपल्याकडे डंपरचा प्रश्न नाही. आपल्याला कचरा टाकण्यासाठी जागा नाही. तीच आपली अडचण आहे. आपल्याला कचरा उचलायला प्रश्न नाही. कचरा उचलायला गाड्या आपल्याकडे सफिशिएन्ट आहेत. इतके गाड्या आपण देवू शकतो.

**हंसुकुमार पांडे :-**

जगह नही है, ऐसा क्यो हुआ। अपने पास तो जगह पहले से पास करके रखा था।

**अजिज शेख :-**

अपने पास पेहले से डेव्हलोपमेंट प्लान मे कोई जगह नही है।

**हंसुकुमार पांडे :-**

लेकीन नगरपालिकाका कुछ कर्तव्य है की नही है। दुसरा जगह देखलेने का? छे महिने मे पाच महिने मे सात जगह बदली किया। ऐसा परिस्थिती नगरपालिका के उपर क्यो आया। उसवक्त प्रशासन क्या करता था। शेख साहब, अपने उपर ऐसा परिस्थिती क्यो आया की पाच - पाच, छे - छे जगह बदलना पडा।

**अजिज शेख :-**

लोग विरोध कर रहे है ना।

**हंसुकुमार पांडे :-**

अपना सबकुछ पास हुआ था, तो फिर उसके उपर काम क्यो नही किया गया।

**अजिज शेख :-**

कौन सा? प्रोजेक्ट ना! प्रोजेक्ट को तो थोडासा टाईम लगेगा।

**हंसुकुमार पांडे :-**

प्रोजेक्ट होगा! लेकीन उसे पेहले अपने पास जगह तो उपलब्ध होना चाहिए ना। उसको डिगिंग करो, कुछ करो नही तो वह जगह धुंडो जगह धुंडने के लिए कितना टाईम लगता है।

**अजिज शेख :-**

उत्तन की जो जगह है। वहा पर हमलोग डिगिंग नही कर सकते। वहाँपर हमलोगो को पोल्युशन कंट्रोल बोर्ड से परमिशन भी नही मिलेगा।

**हंसुकुमार पांडे :-**

ये बात भी सही है। अभी हमारा टाईम भी पुरा होने को आया। नही तो हमलोगो को भी ये टाईम पुरा करने के लिए नगरपालिकामे कचरा लाके डालना पडेगा। डंपिंग नही है तो अभी क्या करे। पब्लिक ये बोलती है की, तुमलोग नगरसेवक कुछ नही कर सकते इसलिए हमलोग कर रहे है। हमलोग पब्लिक को आगे बढने का मौका दे क्या। फिर ये बहोत बडा जन आंदोलन हो जायेगा।

**अजिज शेख :-**

ऐसा नही पर हमलोग भी कोशीश कर रहे है ना।

**हंसुकुमार पांडे :-**

आपलोगो की कोशिश कामयाब होती नही ना। कौनसी कोशिश आपलोगो की कामयाब होती है। नही होती है।

**अजिज शेख :-**

ऐसा तो नही ना की, हम लोग शांत बैठे है। तो आप हमे एक जगह धुंड के दे दो।

**हंसुकुमार पांडे :-**

अगर हमारे पास जगह होती तो हम पेहलेसे बोलते की हमारे जगह मे कचरा डाला करके नगरपालिका को सजेस्ट करते वही।

**अजिज शेख :-**

एक महिने मे हमलोग सात आठ जगह देखते है।

**हंसुकुमार पांडे :-**

हमारे सन्मा. सदस्य नगरसेवक नरेंद्र मेहता ने आप लोगो को सहयोग किया। वो भी आपको कितना टाईम तक सहयोग करेगा।

**अजिज शेख :-**

कुछ लोगो ने सहयोग किया। लेकीन जो प्रॅक्टीकल प्रॉब्लेम निर्माण होगये है। वो मै आपको बता रहा हुँ ना।

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहब ने भी सहयोग किया।

**अजिज शेख :-**

प्रॅक्टीकल प्रॉब्लेम जो है वो मै आपको बता रहा हूँ।

**हंसुकुमार पांडे :-**

प्रॅक्टीकल प्रॉब्लेम आने से पेहले उसपर क्यो विचार नही किया जाता। आने के बाद ही क्यो विचार किया जाता है। हमलोग राजकोट गये थे। उन लोगो ने आगे के बिस साल का सोच के रखा है। बीस साल बाद मे उनका कचरा कितना आयेगा। और हमलोग आज का परिस्थिती का सोच नही पा रहे है। हमारे लिए शरम की बात है।

**अजिज शेख :-**

हमलोग ये प्रोजेक्ट लेने वाले है। वो प्रोजेक्ट लेने के बाद मे पचास साल तक कोई प्रॉब्लेम नही होगा।

**हंसुकुमार पांडे :-**

साहब वो घनकचरा प्रकल्प का २००२ साल से चालू है।

**अजिज शेख :-**

लेकिन अभी जो प्रॉब्लेम आया है। उसी के लिए ये कोशीश चल रही है ना।

**हंसुकुमार पांडे :-**

प्रॉब्लेम आने के बाद उसको देखोगे तो कैसा चलेगा। इसका पहिला निवारण करो। आज पानी का भी परिस्थिती ऐसा है। अभी पानी खत्म हो जायेगा। फिर बादमे ये आयेगा। की, क्या करनेका लोग प्यास से मर रहे है। उससे पहले उसका इंतजाम करलो ना।

**एस. ए. खान :-**

जी इमरजन्सी सेवा आहे त्याच्यावर पहिलेच करा ना.

**हंसुकुमार पांडे :-**

उसका इंतजाम पेहलेसे करो ना। आपको मालूम है।

**तुळशीदास म्हात्रे :-**

काम सुरू आहे. तुम्ही बघायला कधी गेले होते.

**अजिज शेख :-**

आपण दोन प्रोजेक्ट घेणार आहोत आपला ५० टनाचा जो प्रोजेक्ट आहे. त्याचे आपण वर्क ऑर्डर दिलेली आहे. मध्ये तिथे अप्रोजर नव्हता म्हणून अप्रोजर आपण डेव्हलोप करून घेतलेला आहे आणि त्याठिकाणी जी एजन्सी आहे त्यांनी तिथे कामाचा सुरवात केलेली आहे. आपण त्यांना लाईन आउट दिलेले आहे. तिथे त्यांनी फाउन्डेशनच्या कामाला सुरूवात केलेली आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही जावून बघितले का?

**अजिज शेख :-**

बघितले ना. दोन तीन वेळा जावून बघितलेले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

कधी बघितलेत?

**अजिज शेख :-**

साधारणतः पंधरा दिवसापुर्वी बघितलेल आहे.

**जयंत पाटील :-**

शेख साहेब, आपल्या रस्त्यासंबंधी एक कोर्टामध्ये मॅटर होता. तो मिटला का? फॉरेस्ट बेस मॅनेजमेंट प्रकल्प तिथे आपण राबवणार आहोत त्या प्रकल्पाला ॲप्रोच जर आहे तर त्याचे कोर्टामध्ये स्टेटस काय आहे? मी मा. महासभेत विचारले तुम्ही मॅडम यांना विचारून घ्या.

**मा. सभापती :-**

तुम्ही मा. महासभेत विषय घेतलेला?

**जयंत पाटील :-**

हो.

**अजिज शेख :-**

महासभेमध्ये जी चर्चा झालेली होती.

**जयंत पाटील :-**

प्रश्न तो नाही. ॲप्रोच रोड संबंधी विधी अधिकारी सांगतिल. आपण जे मला कोर्टाबद्दल स्टेटस्को लेटर दिले. दि. १९ ला ते काय झाले स्टेटस्कोचे त्या रोड संबंधी. जो पर्यंत तो रोड आपल्या ताब्यात येत नाही तोपर्यंत आपण ॲग्रीमेंट करू शकणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

सभागृहाला उत्तर देवू शकतात, त्यांची आम्ही जेव्हा भेट घेतली तर त्यांनी आम्हाला अस उत्तर दिले होते की, मी फक्त अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करणार नागरिकांना, नगरसेवकांना मी मार्गदर्शन करू शकत नाही असे त्या बोलल्या होत्या. मी काल त्यांना सांगितले होते की, तुमची इकडे नोकरी याच्यासाठी आहे की, महापालिका तुम्हाला जो पगार देणार आहे ते या महापालिकेत साडे सात लाख रू. नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने भरतीय घटनेनुसार जे काही अधिकार दिलेले आहे त्याची जाणीव करून देण्यासाठी तुम्ही इथे आला आहात असे मी त्यांना बोललो होतो. आज सभागृहाने त्यांना अधिकाराची जाणीव करावी आणि त्यांनी ते मान्य करावे.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

काका आपण नविन अधिकारी निवड केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आमच त्यांच्यावर दुमत नाही. अधिकारी हे सभागृहाला बांधिल आहेत. त्यांना त्यांची जाणीव आहे ना?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते, ती जी गाळा आहे ती पाच च्या सुनावणीसाठी आहे. तर तो अप्रोच एवढा आहे. उत्तन सर्व्हे नं. ६५ आणि पाली सर्व्हे नं. एक्झीबेट त्या संदर्भास जागा पेंडींग नाही. पण जे अप्रोच एवढा आहे ते त्या संदर्भात आहे.

**जयंत पाटील :-**

अप्रोच एवढा पुढे जातो. अप्रोच आपल्या साईटवर जातो.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हो सर.

**जयंत पाटील :-**

म्हणजे आपल्या संबंधी आपण तिकडे जावू नये म्हणून स्टेटस्को आहे? मॅडम आपणच मला उत्तर दिलेले आहे. तुम्ही इकडे उत्तर बदलू नका. तुम्ही मला असे उत्तर दिलेले आहे की, त्या रोड संबंधी कोर्टामध्ये स्टेटस्को आहे. राठी नावाची व्यक्ती आहे. त्याचा सर्व्हे नं. १७० आहे. त्या स्टेटस्को बद्दल काय झाले?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

आहे कसा. त्याच स्थितीमध्ये ठेवायचा सांगितलेला आहे आणि तसा ठेवलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, पुढे मुव्हमेंट काय करणार आहेत?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर आता एक्झीबेट ५०० सुनावणी साठी ठेवलेला आहे म्हणजे आता जशी स्थिती आहे तशी आपल्याला मेंन्टेन करायचे आहे. म्हणजे तो रस्ता जेवढ्या मिटरचा आहे त्याला कुठल्याही प्रकारचा हात न लावता आपण तो रस्ता वापरू शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे ही केस पेंन्डींग ठेवणारी आहे का?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

साहेब, नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग काय सांगणार?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मग आता एक्झीबीट ५०० सुनवणी साठी आहे.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

कधी होणार? ते सांगा.

**एस. ए. खान :-**

सुनावणी झाल्यावर नंतर त्याच्यावर फायनल होउन जाईल ना.

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे. समोरच्या व्यक्तीची मागणी काय आहे?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर, आपल उत्तर दाखल झालेले आहे. त्याच्यामध्ये त्यांची जी रोड वाईंडिंगमध्ये जी जागा जात आहे. तर ते म्हणतात की ती जागा जाउ नये तर आपण उत्तर दिलेले आहे की, त्यांना आपण एफ.एस.आय., टी.डी.आर. वगैरे देण्यास तयार आहे.

**मा. सभापती :-**

त्यांची तशी मागणी आहे का? ते टी.डी.आर. वगैरे मागतात का? आणि आपण काही देत नाही. असे आहे का?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

आपण द्यायला तयार आहोत तर ते म्हणतात की, आपला तोच मार्ग एक्झीबीटच्या संदर्भात ५०० सुनावणीचा चालू आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मग, सेटलमेंट करून टाका ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्या अंदाजाप्रमाणे हा स्टेटस्का कधी उठेल आणि कधी ह्याचा डिसिझन येईल.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर, साधारण दोन महिने.

**जयंत पाटील :-**

आपल्या फेवरला निर्णय लागेल का? आतापर्यंत एकही निर्णय आपल्या फेवरला लागले नाही.

**मा. सभापती :-**

आतापर्यंत किती निर्णय लागलेले आहेत?

**जयंत पाटील :-**

एक ही नाही.

**एस. ए. खान :-**

आपल्या बाजूने निर्णय का लागत नाही. कारण आपल्याकडे अधिकारी फिड बॅक बरोबर देत नाही.

**रतन पाटील :-**

फिड नाही. आपले वकिलच तिथे मॅनेज होतात.

**एस. ए. खान :-**

मॅनेज पण होतात आणि फिड बॅक पण बरोबर देत नाही.

**रतन पाटील :-**

मग, निर्णय कसा लागणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, वकिल कोण आहेत?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ॲड. विजय आपटे आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते कॅपेबल आहेत ना.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

तो एक्झिबिट स्टॅकल करुन स्टे व्हॅकेट करण्यासाठी पाठपुरावा करा. ती अत्यावश्यक बाब आहे.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो महापालिकेत एकंदरीत टॅक्स वसुलीचे काम जोराने चालू आहे. भाईंदर पूर्व, भाईंदर पश्चिम सर्व विभागामध्ये चांगल्या पद्धतीने चालू आहे. आपण जो लोकांना पाच टक्के रेबिट दिलेला आहे. तर लोकं त्याचा उस्फुर्तपणे फायदा घेत आहे. तर आपल्याकडून थोड्याशा काही समस्या निर्माण होतात. ज्यावेळेला एखादा नागरिक तिथे टॅक्स भरायला येतो. त्यावेळेचा त्यांना आपण सुरूवातीला पाच टक्के कमी करून देत नव्हतो. कॅश भरल्यानंतर पाच टक्के कमी करून द्यायला सुरूवात केलेली आहे पण चेक भरत असताना तेव्हा त्यावेळेचा इथे असे सांगितले की, जेव्हा चेक पास झाल्यानंतर त्यांना नंतर रेबीट देवू. मान्य आहे. पण चेक देत असताना त्याचा चेक पास झाला की, नाही झाला हे त्या अधिकाऱ्यांना समजत नाही का? १५ दिवसाने लोक त्याची रिसिट घ्यायला जातात. तेव्हा अशा पद्धतीने उत्तर दिले जाते की, तुम्ही तुमचा पास बुक घेवून या त्याच्यावर तुमचा चेक पास झाला की नाही हे तुम्ही दाखवा. मग आम्ही तुम्हाला देवू. तर, ही पद्धत बरोबर आहे का?

**एस. ए. खान :-**

चुकीची आहे.

**रतन पाटील :-**

त्यांना परत किती वेळा हेलपाटा लावायला सांगायचे. त्याच्यामध्ये आणखिन एक सुधारणा जर, आपण चेक घेतो तर, त्याच वेळेला त्याचे रिबिट दिले तर त्यात आपले काही नुकसान नाही. जर, समझा एखाद्या सोसायटीचे चेक बाउन्स होतात. तर आपण त्यांना दहा टक्के दंडाची आकारणी करतो. त्याच बरोबर आपण पाच टक्के रेबिट देतो. ते सुद्धा त्याचे कॅन्सल होते. म्हणजे पंधरा टक्के महापालिकेचा फायदा होतो. चेक देताना आपण रिबिट दिले तरी हरकत नाही. जर चेक पास झाले तर उत्पन्न आपलेच आहे आणि जरी नाही झाले तरी उत्पन्न वाढणारच आहे. दोन्ही गोष्टी आहेत. त्याच्यामध्ये कुठेतरी ताल मेल बघून आपण त्यांना तशी सुचना द्या.

**एस. ए. खान :-**

मी, पण बोलू इच्छितो की सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब जे बोलतात ते अगदी बरोबर आहे. कॅश भरल्यानंतर पुर्ण कॅश भरा नंतर परत घ्या. चेक पण भरताना पुर्ण चेक भरा परत नंतर द्या. पाच टक्के रिबिट देवून टाका आणि बाउन्स झाल्यानंतर आपण दहा टक्के घेतो आणि ५ टक्के कमी भरलेले ते आपण घेवू शकतो ना परत. परत नागरिकांना हेलपाटा घालायला कशाला लावता. कॅशच्या प्रमाणे ते पण आहे. बरेच सोसायटी आहेत. सोसायटीचे चेक हे क्लीअर होतात. १५ रू., २० रू. साठी परत येणार ४० रू. चा खर्च करणार आणि इथे आल्यानंतर कर्मचारी बरोबर उत्तर देत नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा विषय आधी पत्राद्वारे झाला. नंतर मा. महासभेत आला तुम्ही त्या पत्रालाही उत्तर देत नाही. मा. महासभेतही उत्तर देत नाही. लोक पुन्हा पुन्हा तक्रार करतात. सन्मा. सदस्य सभागृहात मांडतात तुम्ही फक्त बघ्याची भुमिका करतात.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

बघायची भुमिका करत नाही. काका असे बोलू नका मी ह्याच्यावर खुलासा करतो.

**रोहिदास पाटील :-**

मी, तुम्हाला एक गोष्ट सांगतो. एकतर कॅश पैसे भरले की, तुम्ही परत देण्याचा अर्ज मागता अर्जाला झेरॉक्स लावायला सांगता. सही कोणाची होते. मी तुम्हाला सांगतो प्रविण ओबेरॉय यांचे ४,००० रू. चे काल पेमेंट झाले. त्या पेमेंट मधले रिटर्न करायचे होते. प्रविण ओबेरॉय आता हयात नाही. तुम्ही पैसे कोणाला दिले. आम्ही जर एखादा अर्ज केला तर तुम्ही सांगता टायटल क्लीअर पाहिजे तुम्ही एवढे मोठे पेमेंट करता तो माणूसच हयात नाही. ह्याच्या प्रॉपर्टीचे त्याला देणे हे महापालिककेने देणे लागते. ते देय करण्यासाठी तो हयातच नसेल तर तुम्ही कोणाला दिले. हे टेक्निकल मुद्दे आहे. आधी ही सांगितले. मा. महासभेनेसुद्धा सांगितले. तुम्ही एक एजेन्सी निट बसवून घ्यायची. तुम्ही कोणला ठेका दिला हे आम्हाला माहित पडत नाही. तो प्रोग्राम का बनत नाही? ऑगस्ट महिन्यात सभेने मंजुरी दिली. त्याच्यानंतर चौथ्या दिवशी तो प्रोग्राम बनायला पाहिजे होता किंवा त्याच्या आधी बनायला पाहिजे होता. ही पावती सरळ मिळाली असती तर हा वादच उभा राहिला नसता.

**तुळशीदास म्हात्रे :-**

एखादी व्यक्ती १५ रू. साठी, १० रू. साठी, ८ रू., ५ रू. साठी परत नगरपालिकेत आपण त्यांना बोलावतो. तर, त्याचा रिक्षाचा खर्च किती? त्याचा टाईम किती जातो. याच्याबद्दल आपण काहीतरी करा. कारण ही फसवणूक केलेली आहे. तुम्ही आम्हाला कशाला सवलत दिली. अशा त-हेने लोकांचे बोलणे आम्हाला ऐकायला येतात. तुम्ही याच्यावर काय बोलता.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

मा. महासभेने नागरिकांकडून प्रॉपर्टी टॅक्स वेळेत भरणा व्हावे. यासाठी जी रिबिट स्कीम जाहिर केलेली होती. त्याप्रमाणात त्याची कारवाई करण्यासाठी प्रत्येक प्रभाग अधिका-याला. त्या ठिकाणच्या नागरिकांचा रिस्पॉन्स लक्षात घेता. साधारणतः दोन - दोन लाख रू. चे ॲडवान्स आम्ही दिलेले आहे आणि कर विभागाच्या प्रस्तावाप्रमाणे अजित पाटील यांच्या शिफारसी नुसार. त्या ठिकाणी कामकाज होत आहे. याठिकाणी चेक च्या बाबतीत जी सुचना आलेली आहे. पर्टीक्युलर चेक कॅश होईपर्यंत तो कॅश जामा झाली असे कोणी मान्य करत नाही. पर्सनली व्यवहारात सुद्धा चेकच्या दोन पावती होतात. एक चेक दिल्यानंतर ची पावती आणि कॅश झाल्या नंतरची पावती. कॅश झाल्यानंतर आपण त्याला रिबिट देतो. तर त्या ऐवजी चेक जमा होताना तुम्ही रिबिट द्या म्हणतात. मग ते तपासून पहावे लागेल की, देता येते की नाही. पण ही रक्कम नंतर आम्ही काढत नाही. सर्व प्रभाग अधिका-यांना ॲडवान्स अगोदर दिलेली आहे आणि ज्यांची रक्कम आपल्याकडे जमा होते. त्यांना तात्काळ रिबिट देण्यासाठी आम्ही निर्देष दिलेले आहे. यामध्ये कामाच्या अनुशंगाने या ठिकाणी सुचना आलेल्या आहेत. त्या सुचना आम्ही निश्चितच त्या विभागाकडे वर्ग करू. पहिला मुद्दा आहे आणि दुसरी बाब अशी आहे की, ज्या नागरिकांचे हयात नाव नसेल आणि त्यांनी चेक दिलेला आहे. ज्या कोणाच्या नावाने प्रॉपर्टी असेल. त्याच्या नावाने ती डिमान्ड असते. त्यांनी नाव बदलून घेतले नसेल तर त्या मालमत्ता धारकाची ती बाब आहे. पण, त्याच्या तर्फे जे वारसदार आहे. त्यांनी तो चेक त्या प्रेजेन्ट व्यक्तीच्या नावाने घेवून यायचा. तर, त्याला तो रिबिट वापस भेटतो. त्या भेट व्यक्तीला रिबिट भेटण्याचे काही प्रश्न येत नाही. तशा सुचना आम्ही त्या लोकांना सुद्धा देवू.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, मी तुम्हाला चेक बद्दल बोललो तर तुम्ही मला कॅश बद्दल बोलतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी तुम्हाला तेच सांगितले जे कॅश भरतात.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी चेक बद्दल बोललो नाही.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

मी, चेक बद्दलचा खुलासा केला. कॅश बद्दल जर मयत व्यक्तीच्या नावी रक्कम असेल तो हयात व्यक्ती भरतो. त्याच्या नावातर्फे तो रक्कम परत त्याला मिळेल. जो कोणी मयत व्यक्तीच्या नावे कॅश भरायला येतो. कोणीही त्याचा अर्जदार वारसदार असतो त्याला ती रक्कम परत भेटेल.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, असे कसे माहित पडेल.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

असे कसे माहित पडणार नाही. कोणतरी आमच्याकडे पैसे घेवून येतोच ना. तुम्ही तुमचे उदा. सांगा काय घडले ते.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुमच्यासमोर मुद्दे ठेवलेले आहेत. तुम्ही फक्त मला उत्तर द्या. आम्हाला लेखी उत्तर द्या. आम्हाला लेखी उत्तर द्या ना.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

तुमच्या बाबतीत काय प्रश्न निभावला जसे सन्मा. सदस्य पाटील साहेब, खान साहेब आणि माजी सभापती साहेब यांनी सगळ्यांनी सांगितले. जसा आपला वैयक्तीक इश्यु काय झाला ते सांगा ना.

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला सांगितले की, प्रविण ओबेरॉय चे नाव त्याच्यातुन काढून टाका. एक व्यक्ती हयात नाही आणि त्यांना तुम्ही नोटीस पाठवली, डिमान्ड पाठवली की, तुम्हाला एक लाख रू. चे पेमेंट करायचे आहे. तुम्हाला त्यांनी येवून कॅश पेमेंट केले.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

कोणी केले?

**रोहिदास पाटील :-**

कोणी माणसाने येवून केले.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

कोणीतरी असेल ना.

**रोहिदास पाटील :-**

कोणितरी आहे आणि त्यांनी केले नंतर तुम्ही जो रीक्वेस्ट लेटर घेतात विनंती लेटर घेतात तर तो एप्लीकेबल त्याला नाही. थर्ड पर्सन कसा करेल. ज्या व्यक्तीला पेमेंट करायचे आहे आणि ती हयातच नाही त्या नावाने तुमचे पेमेंट कसे निघेल?

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

तशा बाबतीत संबंधित नागरिक रिबेट हे मयत व्यक्तीच्या नावाने घेणारच नाही. तो कसे घेईल?

**रोहिदास पाटील :-**

मी, तुम्हाला एक नाव सांगतो छगनभाई मगनभाई बुआ यांना तुम्ही नोटीस पाठवलेली आहे की, एक लाख रूपये भरा. तो व्यक्ती हयात नाही. त्याच्या वारसदाराने येवून पैसे भरले आणि तुम्ही त्यांना रीक्वेस्ट लेटर मागतात ना.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

'काका' ती जी हयात व्यक्ती आहे ना. तर, ती व्यक्ती त्या मयत व्यक्तीच्या तर्फे रिबिट मागणी करेल. स्वतःचे नाव टाकेल ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की, जो माणूस बिल भरायला येईल. त्याला रिबिट मिळेल.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

त्यालाच रिबिट मिळेल. मी सुद्धा हेच सांगतो ना.

**रोहिदास पाटील :-**

पण, हे कायद्यात नाही. माझे मुद्दे बोलून विषय सोडून द्यायचा.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

ज्या प्रॉपर्टीचा टॅक्स जमा झाला. त्या प्रॉपर्टीचा जो कोणी टॅक्स भरेल त्याला त्याचा रिबिट मिळणार आहे. एखाद्या प्रॉपर्टीवर मालक वेगळा असतो आणि कबजेदार वेगळा असतो. कबजेदार टॅक्स भरतो तर त्या मालकाच्या वतीने त्या कबजेदाराला रिबिट मिळेल.

**शशिकांत भोईर :-**

काही जण ट्रान्सफर करून घेत नाही. तर, त्याचा टॅक्स कोण भरणार? हयात असुदे किंवा नसु दे.

**रोहिदास पाटील :-**

बेकायदेशीर एक रूपये घेवू शकत नाही. एक रूपये देवू शकत नाही ते आम्हाला माहिती आहे.

**जयंत पाटील :-**

काका प्रश्न तो नाही पण तो प्रॉपर्टी ट्रान्सफर का करत नाही?

**शशिकांत भोईर :-**

ट्रान्सफर का करून घेत नाही? किंवा नातवाईकांनी ती प्रॉपर्टी हस्तांतरीत करून घ्यायला पाहिजे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

'काका' तुम्ही मला एक सांगा तुमचे घरचे बिल आहे. तुम्हाला वेळ नाही आणि तुमच्या घरचा नोकर येईल आणि सांगेल की, बिल घ्या तर तो बोलतील का रोहिदास पाटीलला घेवून या म्हणून तरच आम्ही तुम्हाला रिबिट देवू. रोहिदास पाटील बोलतील मी माझे काम केले मी बिल भरले माझा कोणीही माणूस येईल त्याला तुम्ही रीबिट देवून टाका.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

आणि फुल सक्सेसरला रिबिट भेटेल.

**रतन पाटील :-**

साहेब, दुसरा प्रश्न असा उपस्थित होता की, आपण चेक दिल्यानंतर पास झाल्या नंतर तुम्ही त्याला पासबुक घेवून कशाला बोलवता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की, आपल्या पालिकेचा जो वॉल्युम आहे तो लार्ज वॉल्युम आहे लाखो चेक येतात, शेकडो चेक येतात. त्याच्या मुळे ते ट्रेस होवू शकत नाही. म्हणून जर समोरच्या व्यक्तीने पासबुक आणले तर समोर समोर क्लीअर होईल. थोडस सहकार्य आपण पण केले पाहिजे ना.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

तपासायची गरज पडत नाही ना.

**रतन पाटील :-**

साहेब, ज्या वेळेला तुम्ही चेक घेतात. त्याच वेळेला सांगा की, तुम्ही पास बुक पण घेता त्यांनी त्यासाठी किती खेपा मारायचा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपली चेकची जी रियलाईज पावती राहते ना. तुम्ही ऐकून घ्या. तुमच्या सुचनेप्रमाणे चेक रियलाईज पावती आम्ही तयार करतो. त्या सोबतच त्या रिबिट ची रक्कम तयार करायला लावतो. त्या वेळेला पास बुक न मागवता. कॅशची पावती तयार करतो ना.

**रोहिदास पाटील :-**

कॉम्प्युटर मध्ये प्रोग्रॅम नाही. असे तुम्ही उत्तर दया ना. बॅंक मध्ये चेक रिलिज झाल्यावर लगेच तुम्हाला त्याचे बिलिंग मिळायला पाहिजे. हे चेक क्लिअर आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मिळते. आणि त्या पध्दतीने त्यांना काम करण्याची आपण सुचना देवू.

**रोहीदास पाटील :-**

काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ज्यांची कॅश जमा झाली. त्यांना तात्काळ रिबिट आणि पावती दयायला पाहिजे. आपण जी पावती देतो चेक कॅश झालेली तिच्या सोबतचा रिबिट द्यायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मी चेक बद्दल थोडं बोलू इच्छितो, आपण जेव्हा ग्राहकांकडून चेक घेतो. कोणाला टॅक्स भरायचा आहे. त्यांनी घेतला, तर आपल्याकडून किती दिवसात बॅंकेत भरला जातो. आपण महिन्या-महिन्याचे दोन-दोन, सहा-सहा महिन्याने टाकलेले नसतात. मग, त्याला जबाबदार कोण? शेवटी चेक आज आला तर उदया बॅंकेत जमा झालाच पाहिजे. आपल्या प्रशासनातर्फे असे होत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सहा-सहा महिने नाही होत.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आहेत. तुम्हाला दाखवतो. जेव्हा एंण्डला म्हणजे ३१ मार्च च्या अगोदर सहा-सहा महिने पास वर एंण्ट्री होत नाही. टाकलाच जात नाही. साहेब, तुम्हाला ते प्रकरण दाखवले तर दुसऱ्या दिवशी तो चेक बॅंकेमध्ये आला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तपासून तो चेक दुसऱ्या दिवशी बॅंकेत तात्काळ जाण्यासाठी आम्ही व्यवस्था करू.

**एस. ए. खान :-**

दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी चेक जायलाच पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

तीन-तीन महिने, सहा-सहा महिने जाता नाही तर किती महिन्याने जातात?

**मा. सभापती :-**

एक-दोन महिने जात असतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

काका, दुसऱ्या दिवशी बॅंकेत आपली अमाउंन्ट जाते.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्या जेन्वी मॅडम यांनी उपस्थित केलेला मुद्दा फवारणी बाबतचा होता. त्यांचा तो योग्य मुद्दा होता.

**मा. सभापती :-**

आपण ह्या विषयावर नंतर चर्चा करु.

**शशिकांत भोईर :-**

चर्चा नाही करत आपण त्याला वर्षाला एकोणीस लाख रु. देतो. आणि महिन्याला फवारणी होत नाही. म्हणून मलेरिया, डेंग्यू, ह्याची साथ येते. आता बोलतात की, डेंग्यू हा चांगल्या पाण्यामध्ये होतो. मग, त्यावर उपाय काय? त्यांनी फवारणी करायची की आपण करायची. शेवटी डेंग्यू हा मच्छरच आहे ना. मग, ती फवारणी योग्य वेळी, योग्य प्रमाणात झाली. तरच ती डास मरेल ना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही सिरियस का घेत नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपण त्यांना एकोणीस लाख रु. देतो. ते देवून सूद्धा ते लोक व्यवस्थित फवारणी करत नाही. त्यांची फोक मशीन बरोबर चालू नसते. मॅडमने विषय घेतलेला त्यावेळेला मी योग्य वेळी गप्प होतो. कारण, त्या वेळेला कचऱ्याचा विषय होता. मॅडम, तुम्ही ह्याच्यावर आता बोला.

**मा. सभापती :-**

फवारणी होत नाही का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याकडे जी औषध फवारणी होते. तुम्ही त्याच्यावर किती लक्ष केंन्द्रित केलेले आहे. ते सांगा.

**हंसुकुमार पांडे :-**

बायर्स कंपनीके दवाईसे भाईंदर के मच्छर गायब हो गये थे।

**जेन्वी आल्मेडा :-**

मा. अध्यक्ष महोदय माझी या ठिकाणी अशी मागणी आहे की आरोग्य विभागामार्फत जे औषध फवारणीचे टाईम टेबल आखलेले आहे. त्या टाईम टेबलची प्रत सर्व सन्मा. सदस्यांना देण्यात यावी.

**मा. सभापती :-**

तुम्ही तुमची मच्छर फवारणी संपूर्ण शहरात केली तर तुम्ही मच्छर फवारणी केली की नाही याची खात्री होईल.

**जेन्वी अल्मेडा :-**

नागरिकसुध्दा आम्हाला विचारतात तेव्हा आमच्याजवळ उत्तर नसते.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आमची तुम्हाला विंनती काय आहे. तुम्ही असे म्हणता की, आम्ही टिका करतो. अशा दृष्टीकोनातुन तुम्ही बघता. आम्ही तुम्हाला काय म्हणतो की, डेंग्युचे जसे पेशन्ट वाढत चाललेले आहे. म्हणून त्या पातळीवर तुम्ही त्याला निर्देष काय दिले. काय काम करायला दिले? एक पंपाच्या ऐवजी दोन पंप दिले. दोन माणसाच्या ऐवजी चार माणसं दिली का? दोन ट्रकच्या ठिकाणी सहा ट्रक दिले का? हे औषध नको. ते औषध हवे. असे सांगितलेले आहे का? त्यांचे ते काम रुटींनचे चालू आहे. त्या रुटींनच्या कामासाठी तक्रार नाही. ही भयंकर परिस्थिति निर्माण झाले. त्याच्यावर आपला पर्याय म्हणून काय सांगणार? मा. आयुक्त म्हणून आजच्या सभेत तुम्ही काय निर्देष देतात. त्यांची आम्हाला अपेक्षा आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. अध्यक्ष महोदय, त्याची नोंद घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ह्याची नोंद घेतलेली आहे आणि संबंधित उत्तनच्या बाबतीत डेंग्युच्या पेशन्टची जी तक्रार आहे. त्या अनुषंगाने संबंधितांना मा. आयुक्त साहेबांनी सक्त सुचना दिलेल्या आहेत. त्यांची केस हिस्ट्री तपासायला सांगितलेली आहे. त्या भागाचा डिटेल सर्व्हे करायला सांगितलेला आहे आणि त्या अनुषंगाने प्रतिकारात्मक जी कारवाई करणे आपल्याला अपेक्षित आहे. त्या लोकांमध्ये लोक जागृत करणार. त्या अनुषंगाने पॅम्प्लेट काढणार आणि आवश्यक ती फवारणी वगैरे स्वच्छता याची दक्षता घेण्यासाठी आम्ही परत नियोजन करुन कामकाज करु.

**शशिकांत भोईर :-**

आमचं म्हणणं काय आहे? की, ऐकोणीस लाख रुपये आपण महिन्याला खर्च करतो किंवा आणखीन जास्त पैसे खर्च करायचे की, हा सक्षम नाही. एकोणीस लाख रुपये देवूनसुध्दा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

पैसे जास्त खर्च करण्याचा इश्यु नाही.

**शशिकांत भोईर :-**

मुद्दा असा आहे की, आपण पॅम्प्लेट काढणार, जनजागृती करणार. मग, आता आपण एकोणीस लाख रुपये देतो. तो सक्षम नाही का? तर ते एकोणीस लाख रुपये असेच त्याच्यावर लाटायचे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

डेंग्युची परिस्थिती अशी आहे की, त्याची जी लक्षणे आहेत ............

**शशिकांत भोईर :-**

डेंग्यु पण हा मच्छरच आहे ना. डॉ. साहेबांनी स्पष्ट केलेला आहे. डेंग्यु हा पाणी पिल्याने तर होतो की, काही कापल्यानंतर होतो. त्याचे स्पष्टीकरण करा ना. डेंग्यु मच्छर आहे ना. मच्छर मेल्यानंतर डेंग्यु कसा होणार.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

डेंग्यु हा मच्छराचा इश्यु आहे. डेंग्यु कशामुळे होतो. कोणत्या मच्छरमुळे होतो. मच्छरची उत्पादकता कोणत्या ठिकाणी होते. नागरिकांनी काय दक्षता घ्यायला पाहिजे. त्याचे पॅम्प्लेट तयार करायला आम्ही

सांगितलेले आहे आणि त्या भागामध्ये सर्वांना फिरवण्यासाठी आपल्या ऑफिसमध्ये ते पॅम्प्लेट सर्वांना उपलब्ध करुन देवू आणि त्याचा जो कॉजल आहे. साईन्टीफिकली त्याची जी हिस्ट्री आहे. ते सर्व नमुद करुन त्याच्यामध्ये ५०-६० हजार रुपये खर्च येईल. म्हणजे फार मोठा बोजा आपल्यावर होणार नाही. त्याच्यातुन लोकांना चांगली कल्पना येईल आणि आपला परिसर स्वच्छ ठेवून आपल्याला मदत करतील. आम्ही त्याच्यामध्ये वेगळा खर्च करणार नाही. कारण ती फार मोठी स्किम नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही आमच्या दोन गोष्टी ऐकून घ्या मग काय निर्णय घ्यायचा तो घ्या. आपल्याला मी काय म्हणतो की, तुम्ही हे सर्व्हे करा ते करा. प्रोग्राम बनवा, पॅम्प्लेट छापा हा भाग नंतरचा झाला आणि हा विषय आज आलेला नाही. ह्या विषयाला वर्ष झालेले आहे. गेल्यावर्षी आपण त्या लोकांना पेमेन्ट केले. आता कोणाला पेमेन्टही करत नाही. वैद्यकीय मदत ही करत नाही आणि तुमचा कार्यक्रम चालू आहे असे तुम्ही सांगता. तुम्ही त्याला असा निर्देष का देत नाही की, ज्याठिकाणी डेंग्युची तशी परिस्थिती नाही. मग तो मिरारोडला असेल, पूर्वेला असेल, पश्चिमेला असेल किंवा मिरारोडला असेल. तर तिकडची टीम उचलून आज दुपार पासून उत्तनमध्ये एका दिवसात एकदा फवारणी करुन घ्या ना. आपण असे निर्देष का देत नाही? म्हणजे आपण असे सांगता की, काम प्रोसेसमध्ये आहे. वर्क इन प्रोग्रेस. चला काम चालू रस्ता बंद` असे तुमचे काम चालू आहे.

**रमेश जैन :-**

हम लोग जो मेडिसीन युज कर रहे है। वह मच्छर मरने के लिये युज कर रहे है। इसके लिये मेडिसीन अच्छा युज करेंगे तो मच्छर मारेंगे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे मच्छर मारण्यासाठी काही स्प्रे आहे का?

**रमेश जैन :-**

मच्छर मरनेके लिये अपने यहा पालिका का काम है।

**रोहिदास पाटील :-**

एक उहा पंपच्या ठिकाणी १०० पंप त्याठिकाणी लावा. मा. आयुक्त साहेब, कोणत्या विभागात डेंग्युचे पेशन्ट नाही असे तुम्ही सांगा आणि कोणत्या विभागात आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

अंदाजित किती वेळ लागेल?

**रोहिदास पाटील :-**

कोणत्या विभागामध्ये डेंग्युचे पेशन्ट नाही आणि कोणत्या विभागात जास्त आढळले. आपण एवढी माहिती द्या.

**डॉ. पडवळ :-**

आजची अशी माहिती आहे की, मिरारोडमध्ये साईकृपा हॉस्पीटलमध्ये एक डेंग्युचा रुग्ण दाखल आहे आणि तिकडच्या डॉक्टरांना मी आताच फोन करुन सांगितलेले आहे की, त्याप्रमाणे तुम्ही माहिती घेवून तुम्ही रिपोर्ट द्या आणि उत्तनचे म्हणाल तर उत्तनमध्ये परवा आणि काल असे दोन दिवस मिळून चार डेथ झालेले आहेत. त्या चार पैकी एक व्यक्ती आहे ती हार्ट अॅटॅकने वारलेले आहे. दुसरी व्यक्ती ती ८५ वर्षाची लेडीज आहे. ती व्यक्ती बोटीवरुन मृत आढळलेली आहे. मग, त्यांच्याबद्दल माहित नाही की, त्यांना काय झालेले. तिथे डिस्पोज ऑफ पण झालेली आहे. एक १८ वर्षाची मुलगी आहे. तीला दोन दिवस ताप होता आणि परवा रात्री तीला स्थानिक लोकल प्रॅक्टीशनर दोन-तीन सलायन लावले हाते आणि नंतर तीचा पूढील उपचारासाठी एखाद्या मोठ्या हॉस्पीटलमध्ये न्या असे त्यांनी तीला सांगितले होते. त्यांनी सकाळपर्यंत वाट पाहिली तर, सकाळी व्यवस्थित होती. पण तीची नेमकी माहिती मिळू शकली नाही आणि तीला उलट्या झाल्या आणि ती मृत झाली. एवन पोसा हॉस्पीटलमध्ये नेले होते. पण त्या डॉक्टरांनीसुध्दा डेथ सर्टीफिकेट देण्यासाठी नकार दिला की, ह्याचे कारण आम्ही सांगु शकत नाही. पोस्टमार्टम करावे लागेल असे सांगितले होते. नंतर, तीचा पोस्टमार्टम झाला नाही. नंतर तीला डेथ सर्टीफिकेट कोणीतरी दिले आणि ती पण बॉडी डीसपोज ऑफ झालेली आहे आणि एक तीन महिन्याची मुलगी आहे तीचा आज सकाळी मृत्यु झालेला आहे. तर तिचाबर्थ वेट हे १.९ किलो होता. म्हणजे ती मुलगी जन्मापासून अंडरवेट होती आणि तिचे ब-याच दिवसापासून उपचार चालू होते. एवन तिचा सी.टी. स्कॅन पण केलेला होता. रात्री आम्ही स्कॅन घेतला तिथेसुध्दा आम्ही दाखवले की, असे इथे-इथे डॉक्युमेन्टली उपचार चालू आहे. ह्याच्यात आम्ही काही करु शकत नाही. तर, तिला रात्री श्वासोश्वासाचा त्रास झाला. ब्रिदींग प्रॉब्लम होता त्यामुळे सकाळी ती बेहोश झालेली. अशाप्राकारे उत्तनची माहिती आहे

**रतन पाटील :-**

पडवळ साहेब, काल नवघर साईबाबा नगरमध्ये तसे पेशन्ट होते ते आपल्याकडे आले होते. आपण काल मुंबईला मिटींगमध्ये होतो. तर तिकडे सुध्दा डेंग्युचे रुग्ण आढळले. साईबाबा नगरमध्ये चार-पाच केसेस झाले.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला रोजच्या रोज माहिती मिळते. आम्ही त्रास देत नाही. तुम्ही खरी माहिती द्या आणि त्याला खरा पर्याय दया.

**रतन पाटील :-**

त्यांच्यासाठी दक्षता घेण्यासाठी तुम्हाला सांगतो दुसरे काही नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

शासनाकडून आपल्याला जो जो अपेक्षित आहे. त्यांची सर्वांची इनव्हालमेंट घ्यायची आहे. आणि इथे त्या लेवल वर त्या ठिकाणी असा एरिया आयडन्टीफाय झाला तर त्याच लेवल वर करायचे

**डॉ.पडवळ :-**

काल उत्तन मध्ये १० वर्कर लावून पुर्ण सफाई आणि फवारणी करुन घेतलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

अध्यक्ष साहेबांना विनंती आहे की, आता डेग्यूचा जो मच्छर तयार होतो. जे पाणी आहे तर, त्या पाण्यात आपण ड्रॉप तरी टाकू शकतो ना. जेव्हा फवारणी करत असतील त्या वेळेला असे पाणी आढळलें की.............

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

ते पाणी नष्टच करायला पाहिजे..

**शशिकांत भोईर :-**

मग, तुम्ही त्यावेळेला सांगायला पाहिजे होते की,

**बालाजी खतगावकर :-**

त्यांच्यामध्ये शासनाचा ग्रामीण भागामध्ये पाण्याचा नायनाट करणे हा कार्यक्रम घेतला. शासनाने फार मोठया प्रमाणात म्हणजे आपण जे पाणी साठवुन ठेवतो घराच्या बाजुला खापर वैगरे असतात. किंवा फुटलेले भांडे असतात. किंवा अर्धवट मातीचे भांडे असतात त्यांच्यामध्ये पावसाचे पाणी साचून असतो कोणी ही बॅक साईडला लक्षच देत नाही. एखाद्या घरामध्ये टायर पडलेला किंवा अर्धवट कापलेला किंवा रिकामा बास्केट पडलेला आतात तशा त्या पिव्वर पाण्यामध्ये जर ते पाणी कंन्सीस टाईम मध्ये राहिला तर तिथे तो डास अंडी टाकु शकतो.आणि त्या ठिकाणी त्यांची उत्पत्ती होते. घाण पाण्यामध्ये घाण ठिकाणी हा डास टिकत नाही. तर तो डास जर पर्टीक्युलरली चावला. त्याचा जो विनाशक बाधक जंतू आहे. तो त्याच्यावर असतो. आणि त्यामुळे शरीराला ताप आणून डेंग्यू होतो. तर, त्या उत्पत्तीत जे प्लेस आहे. तेच आपल्याला नष्ट करावे लागणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

ज्या वेळेला ती लोक फवारणीसाठी जातात त्यांना तसे पाणी आढळले. त्यांनी सांगून टाकायचे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

ते पाणी शुद्ध करु शकत नाही. किंवा त्याचा र्निजंतुक म्हणू शकत नाही. तर ते पाणी नायनाट करावे लागते.

**शशिकांत भोईर :-**

तर ते पाणी सांडून टाकायचे ना. त्यामुळे अशी उत्पत्ती होते. जेव्हा गटारात फवारणी करतो तेव्हा तो अळीनाशक म्हणून ते टाकतो ना. त्याप्रमाणे अळीनाशक म्हणून पाणी खाली टाकायचे ना. आणि अध्यक्ष साहेब, त्याचप्रमाणे आपण मागील मिटींगमध्ये १६ कर्मचारी कॉम्प्यूटरच्या जागी घ्यायचे होते. तर त्याच्यावर अजून पर्यंत कारवाई झाली नाही. एक महिना होवून झाला.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही कॉम्प्यूटर पण घेत नाही. एवढं साडे सात लाख लोकांच्या पाण्याचा कारभार चालतो. आता, कॉम्प्यूटर पण नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपण मंजूरी पण दिलेली कारवाई काहीच नाही. खांबित साहेबांनी नाव पण सांगितलेले त्याचा फायदा पण झाला नाही.

**रोहिदास पाटील :-**

२४,००० रु. मध्ये आता कॉम्प्यूटर येतात.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मग ह्या कर्मचा-यांचे काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

पाणी पुरवठा विभाग बघतील.

**शशिकांत भोईर :-**

पाणी पुरवठा विभाग नाही. साहेब, आपण ७१ संगणक चालक घेतले. त्याच्यात १६ अजून ॲडिशनल केलेले तर अदयाप पर्यंत आम्हाला काही बोलले नाही की हा इकडे पाठवा तो तिकडे पाठवा म्हणून. एक महिना झाला. अदयापपर्यंत प्रशासाकडून काहीच कारवाई झाली नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्ो.) :-**

आपल्याला आवश्यकते प्रमाणे संगणक चालक घ्यायचे होते.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण शब्दरचना बदलू नका.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही शासकीय भाषा बोलता.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही शब्दरचना बदलू नका. इथे माजी सभापती साहेब पण आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही एकदा, दोनदा, तीनदा आम्हाला फसवले. जास्त वेळ फसवू शकत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्ो.) :-**

काका तुम्ही आमचा अगदी अंत घेताय. मला काय म्हणायचे आहे की, विभागाची मागणी तरी यावी लागेल. मला माणसं द्यायला काही ना नाही. माणसं आपल्याकडे आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपण असे का उत्तर देता की, निर्देश दिलेले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्ो.) :-**

दोन दिवसामध्ये सर्व विभागाची मागणी घेवून यामध्ये कारवाई करु.

**ज्युडी डिसोझा :-**

अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने बोलते. आणि विषयाला सोडून बोलते. त्याची माफी असावी. जे कुत्रे पकडले जातात. आणि उत्तनला नेतात. तर उत्तनवरून आणल्यानंतर ते दोन ट्रक माझ्या दरवाजासमोर ते कुत्रे रोडके झालेले मरायला टेकलेले ते सगळे दोन दिवसापासून सोडले. म्हणजे ते काय माझा दारासमोरुनच पकडून नेले होते काय? तिथे चार मुलांना ही ते कुत्रे चावले. याची जरा नोंद घ्या.

**मा. सभापती :-**

याची कारवाई करुन घेवू.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्ो.) :-**

आम्ही नोंद घेतो.

**नगरसचिव :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने १०० वा विषय विषय पत्रिकेवर आलेला आहे. तो चूकून आलेला आहे म्हणून तो रद्द करण्यात आलेला आहे.

(नगरसचिव यांनी प्रकरण क्रमांक ९८ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष साहेब,पान नंबर ५ वर नवघर मराठी शाळेसमोरच्या टप-या उचलण्या संबंधी विषय होता. तर त्या टप-या उचलण्याच्या बाजूला राहिल्या. उलट तिथे आणखीन टप-या आल्या.

**मा. सभापती :-**

ह्याच्यावर कारवाई करुन घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्ो.) :-**

अतिक्रमण विभागाला सांगून हे काम करून घ्यायला सांगतो.

**जयंत पाटील :-**

अतिक्रमण विभाग काहीच करत नाही. अख्या नवघर रोडला टप-या वाढलेल्या आहे. आपलं काम हातातले करून घ्यायला पाहिजे. कधी करणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा्ो.) :-**

तो तसं बोलला.

**हंसूकुमार पांडे :-**

मा. सभापती साहेब, हमने महासभा मे विषय दिया था। बडे नाले के उपर स्लॅप डालके उसके उपर भाजी मार्केट शिफ्ट करने का तो मे आपसे विनंती करता हूॅ की, वो अभि वो नाला पूरा बन गया। खाली उसपे स्लॅप पास करवा के लो। खांबित साहब के पास मेरा लेटर है। दोनो नाले के उपर स्लॅप डालेंगे तो भाजी मार्केट पुरा शिफ्ट हो जायेगा। तो अच्छा वातावरण हो जायेगा। पुरा नवघर रोड क्लिन हो जायेगा। साहब, चिंतामणी अपार्टमेंट के पास नाला है। और एक किरण नगरमें नाला है। मैंने लेटर दिया है, तो उनको फेरिवाला झोन बनाके भाजी मार्केट शिफ्ट कर सकते है। फिर उसके बादमे जो यू.पी. वाले भाजीवाले आयेंगे तो उनको बैठने देनेका नही।

**मा. सभापती :-**

मेरा भी यही कहना है? की, बादमे उधर किसीको बैठने को देनेका नही। इसका खूलासा करते है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्याची पाहणी करुन हा प्रस्ताव सादर करा. ती नोंद घेतलेली आहे. आपण कारवाई करु. नवघर शाळेचा. आम्ही अतिक्रमण विभागाला सांगून साहेबांसमोर आणून त्यांना आपण काढायला लावू.

**एस. ए. खान :-**

साहेब, पहिल्या पानावर जे प्रीजम लिहिलेले आहे तिथे रेडियन सोसायटी आहे. आणि चार नंबर लाईन वर सुद्धा प्रिजम च्या तिथे रेडियन सोसायटी करा.

(सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी प्रकरण क्र. ९८ च्या ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सर्वानुमते ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ९८ :-**

दि. १४/०७/२००६ (तहकुब) व दि. १४/०७/२००६ (दि. १४/०७/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १०० :-**

दि. १४/०७/२००६ (तहकुब) व दि. १४/०७/२००६ (दि. १४/०७/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभांच्या इतिवृत्तांतांमध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ९९ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. ९९ च्या ठरावाचे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सर्वानुमते ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ९९ :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मंजुरी देणे.

ठराव क्र. १०१ :-

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A. Ë. | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | ]plabQa iSallak | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | p`staivat vaaZIcal r@kma | AiBap`aya |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1 | maako-T baaMQakama | - | ८० laxa | २६.५६ laxa | ५३.४४ laxa | १) सार्व. इमारती (विदयुत दुरुस्ती )<br>२) सार्व. उदयाने (विदयुत दुरुस्ती )<br>३) स्मशानभुमी (विदयुत दुरुस्ती )<br>४) सिग्नल यंत्रणा<br>५) सार्व. इमारती दुरुस्ती | - | १०.००<br>०८.००<br>०५.००<br>१०.००<br>२५.०० | १०.००<br>७.६१<br>०५.००<br>७.५८<br>२४.७८ | १६.००<br>१५.००<br>०५.००<br>०८.००<br>०७.०० | मार्केट बांधकाम या लेखाशिर्षाखाली आजपर्यत झालेला खर्च व ३१ मार्च २००७ पर्यत होणारा खर्च गृहीत धरता सदर लेखाशिर्षातुन रु. १६ लक्ष सार्व.इमारती (विदयुत दुरुस्ती) रु. १५ लक्ष सार्व. उदयाने (विदयुत दुरुस्ती), रु. १० लक्ष सिग्नल यंत्रणा, रु. ०५ लक्ष स्मशानभुमी (विदयुत दुरुस्ती), रु. ०७ सार्व. इमारती दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यास शिफारस आहे. |
| 2 | ivaVut daihnaI | 1 | 50.00 laxa | | | sava-QamaI-ya ]%sava vyavasqaa | 40.00 laxa | 1 | 39.11 laxa | 25.00 laxa | ivaVut daihnaI yaa laoKaiSaYaa- KalaI $.50.00 laxa trtUd AsaUna 31 maaca-2007 pya-Mt haoNaara |

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A. Ë. | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | ]plabQa iSallak | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | p`staivat vaaZIcaI r@kma | AiBap`aya |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | Kca- gaRhIt Qarta sadr laoKaiSaYaa-tUna 25.00 laxa |
| | | | | | | mahapaOrÀ Aayau@t inavaasasqaana | 10.00 laxa | 1 | 1 | 24.00 laxa | sava- QamaI-ya ]%sava vyavasqaa va 24.00 laxa $pyao mahapaOr ÀAayau@t inavaasasqaana yaa laoKaiSaYaa-t vaga- haoNyaasa iSafarsa Aaho. |
| 3 | विकास आराखडयातील जागा संपादित करणे. | - | ८०.०० लक्ष | - | ८०.०० लक्ष | गटारे नविन | - | ६५०.०० लक्ष | - | ७९.०० | विकास आराखडयातील जागा संपादन करणे या लेखाशिर्षकाखाली आजपर्यत झालेला खर्च व ३१ मार्च २००७ पर्यत होणारा खर्च गृहीत धरता रू. ७९.०० |

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A. Ë. | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | ]plabQa iSallak | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | p`staivat vaaZIcaI r@kma | AiBap`aya |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | लक्ष रक्कम गटारे नविन या लेखाशिर्षकाखाली वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| 4 | भुयारी गटारे सर्वेक्षण / योजना | - | १७५.०० लक्ष | ४३.५९ लक्ष | १३१.४१ लक्ष | गटारे नविन | - | ६५०.०० लक्ष | - | १००.०० | भुयारी गटारे सर्वेक्षण / योजना या लेखाशिर्षकाखाली आजपर्यत झालेला खर्च व ३१ मार्च २००७ पर्यत होणारा खर्च गृहीत धरता रू. १००.०० लक्ष रक्कम गटारे नविन या लेखाशिर्षकाखाली वर्ग होण्यास शिफारस आहे. |

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A. Ë. | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | ]plabQa iSallak | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | p`staivat vaaZIcal r@kma | AiBap`aya |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 5 | मैदाने विकास | - | ५०.०० लक्ष | १८.३० लक्ष | ३१.७० लक्ष | गटारे नविन | - | ६५०.०० लक्ष | - | ३०.०० | मैदाने विकास या लेखाशिर्षकाखाली आजपर्यत झालेला खर्च व ३१ मार्च २००७ पर्यत होणारा खर्च गृहीत धरता रू. ३०.०० लक्ष रक्कम गटारे नविन या लेखाशिर्षकाखाली वर्ग होण्यास शिफारस आहे. |
| 6 | iSavaar gaaD-naÀTa}na pak- | 1 | 75.00 laxa | | | rsto du$stI | 550.00 laxa | 1 | 81.59 laxa | 50.00 laxa | iSavaar gaaD-naÀTa}na pak- yaa laoKaiSaYaa-t $.75.00 laxa trtUd AsaUna 31 maaca-2007 pya-Mt haoNaara Kca- gaRhIt Qarta sadr laoKaiSaYaa-tUna 50.00 laxa rsto du$stI |

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A. Ë. | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aajatar Kopya-Mtcao Kca- | ]plabQa iSallak | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aajatar Kopya-Mtcao Kca- | p`staivat vaaZIcal r@kma | AiBap`aya |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | yaa laoKa iSaYaa-t vaga- haoNyaasa iSafarsa Aaho. |
| 7 | mau#ya kayaa-laya [maartÀ fina-car | 1 | 140.00 laxa | | | rsto naivana | 450.00 laxa | 1 | 313.81 laxa | 100.00 laxa | mau#ya kayaa-laya [maartÀ fina-car yaa laoKaiSaYaa-t $.140.00 laxa trtUd AsaUna 31 maaca- 2007 pya-Mt haoNaara Kca- gaRhIt Qarta 100.00 laxa rsto naivana yaa laoKaiSaYaa-KalaI vaga- haoNyaasa iSafarsa Aaho. |

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A. Ë.** | **p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa-** | **baaMQakama ivaYayak saovaa vagaOro** | **mauL Anaudana** | **Aaja tarKo pya-Mtcao Kca-** | **]plabQa iSallak** | **p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa-** | **baaMQakama ivaYayak saovaa vagaOro** | **mauL Anaudana** | **Aaja tarKo pya-Mtcao Kca-** | **p`staivat vaaZIcaI r@kma** | **AiBap`aya** |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12** |
| 8 | DI.pI.raoD | 1 | 845.00 laxa | | | rsto naivana | 450.00 laxa | 1 | 313.81 laxa | 100.00 laxa | DI.pI.raoD yaa laoKaiSaYaa-KalaI $.845.00 laxa evaZI trtUd AsaUna 31 maaca- 2007 pya-Mt haoNaara Kca- gaRhIt Qarta sadr rkmaotUna 100.00 laxa rsto naivana yaa laoKaiSaYaa-KalaI vaga- haoNyaasa iSafarsa Aaho. |
| 9 | Baa[-Mdr³pU.´ va ³p.´ caaOpaTI | 1 | 25.00 laxa | | | gaTaro du$stI | 250.00 laxa | 1 | 90.87 laxa | 24.00 laxa | Baa[-Mdr³pUva-´ va ³piScama´ caaOpaTI ivastar yaa laoKaiSaYaa-t $,.25.00 |

| | yaa iSaYaa-tUna | | | | | hyaa iSaYaa-t | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A. Ë. | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | ]plabQa iSallak | p`Qaana¸ gaaONa va tpiSalavaar iSaYa- | baaMQakama ivaYayak saovaa vagaOro | mauL Anaudana | Aaja tarKo pya-Mtcao Kca- | p`staivat vaaZIcaI r@kma | AiBap`aya |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | ivastar | | | | | | | | | | laxa trtUd AsaUna 31 maaca- 2007 pya-Mt haoNaara Kca- gaRhIt Qarta $.24.00 laxa gaTaro du$stI yaa laoKaiSaYaa-KalaI vaga- haoNyaasa iSafarsa Aaho. |

वरील पुर्नविनियोजन पत्रकानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- सौ. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १०० चे वाचन केले.)

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी ह्याच्यामध्ये खुलासा करतो. आपली जी सर्व कामकाज विषय पत्रिका आहे. त्यामध्ये १०० जो विषय आहे. सचिवांच्या सुचनेप्रमाणे हा विषय डबल झालेला आहे. इथे फक्त नंबर दुरूस्ती आहे. दुरूस्तीचा अजेंडा सर्वांना मिळालेला नाही. विषयाचे क्र. फक्त बदललेत.

(सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. १०० च्या ठरावाचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

आपल्याकडे विधी सल्लागार आहे आणि त्यांना सहाय्यक हवा. जो अनुभव आहे. अनुभवसूद्धा तोकडा आहे. एक वर्षाचा अनुभव आहे. दोन वर्षाचा अनुभव आहे. आपल्याला अनुभवी पाहिजे होते. ह्यावर्षी पाहिजे होते. त्यानंतर पुढच्या केसेस हॅण्डल करू शकतात आणि नवीन जर एक वर्षाचा असेल तर त्यांनी किती केस हॅण्डल केले असतील असा दाखला घ्या. प्रत्येक कोर्टात हरले. जे हरले म्हणून..

**एस. ए. खान :-**

आपले जे नेमणूक केलेले ॲडव्हकेट आहे...

**रतन पाटील :-**

त्यांना सहाय्यक कशासाठी पाहिजे तेवढे सांगा. आपले विधी सल्लागार सक्षम नाही का?

**एस. ए. खान :-**

जे ॲडव्हकेट नेमले ते सुद्धा अनुभवी नाही. वन साईडच डिसीजन होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. नाही वन साईड हा मान्यतेचा विषय आणलेला आहे. आपल्या ठरावावर चर्चा होत आहे.

**एस. ए. खान :-**

हा विषय कोर्टाचा वन साईडच होतो ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण महापालिके अंतर्गत विधी कार्यरत केलेले आहे. विधी अधिका-यांची नियुक्ती केलेली आहे. आणि त्याचा एक ढाचा असतो तो तयार करणे आवश्यक आहे. तर त्यासाठी कमीत कमी दोन सहाय्यक त्यांना अपेक्षित असल्याचा प्रस्ताव दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

कशासाठी? मागील स्थायी समितीमध्ये अशी चर्चा झालेली होती. आपण जेव्हा विधी सल्लागार म्हणून नेमणूक करणार आहोत. त्या वेळेला रिटायर जज ज्याला कोर्टाचा अनुभव आहे. १० ते १५ वर्षाचा अशा पद्धतीने त्याची नियुक्ती व्हावी. अशा पद्धतीने स्टॅण्डींगमध्ये विषय पण आला असता आणि तशा पद्धतीने सहाय्यक रिटायर जज होते. त्याच्यानंतर आपण जेव्हा ह्यांची नियुक्ती केली. ते रिटायर जज आहे का? आपण इथे नेमणुक करते वेळी रिटायर जज म्हणून करू. आता, आपण परत इथे सहाय्यक म्हणून मागणी करतात. ते कशासाठी? जे विधी सल्लागार आहेत. ते काय करणार? ते सक्षम नाहीत मग ते कशासाठी?

**एस. ए. खान :-**

या मानधनावर रिटायर जज येवू शकतो.

**रतन पाटील :-**

रिटायर जज येवू शकतो. पण सहाय्यक कशाला? का म्हणून? जनतेवर का बोजा टाकता? सक्षम नाहीत का? आपल्याला कशासाठी पाहिजे ते सांगा? त्यांच्याकडे कामे जास्त झालेली आहेत की, त्यांच्याकडून कामे होत नाही? की कामे दूसरी कडे सांभाळायला? आपले वकिल कोर्टामध्ये सांभाळतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मला तोच खुलासा करायचा आहे की, आपले कामकाज विचारात घेता. इंडस्ट्रीयल कोर्ट आहे. डिस्ट्रीक्ट कोर्ट आहे, हायकोर्ट आहे. अजून इतर वेगळे कोर्ट आहेत. ॲट ए टाईम एक व्यक्ती चहूकडे जावू

शकत नाही. त्यामुळे त्यांना तर दोन सहाय्यक राहिले असते. तर कामाचे नियोजन करता आले असते. काही विषय वाटून दिले असते. आणि आपल्या कामकाजाला ढाचा तयार झाला असता. आज आपली जी परिस्थिती आहे. आपण सर्वजण चर्चा करतात. त्याच्यात निश्चित सुधारणा होईल. त्यात मदत होईल.

**रतन पाटील :-**

साहेब, मागच्या वेळेला आपण सांगितले की, कोर्टाची कामे वकिल बघतात असे आपणच सांगितले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

एकीकडे कामकाज होत नाही. एकदा सेट अप ढाचा तयार झाला.

**रोहिदास पाटील :-**

यशस्वी होत नाही म्हणून मी बोलतो. त्यांनी चार्ज घेतल्यापासून.....

**एस. ए. खान :-**

विधी विभागामध्ये स्टाफ किती आहे?

**रोहिदास पाटील :-**

आपण असे निर्णय घेणार का? की, त्यांनी ज्या दिवसापासून चार्ज घेतला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

त्यांचे सुध्दा आपल्याला आउुट पुट करता येईल.

**रोहिदास पाटील :-**

इतक्या वेळेला त्यांनी इक्झीबीट केल. हे पुर्ण केले त्यांचा निकाल ही लागला आणि आता त्यांना सहय्यक पाहीजे. त्या एक मागतात तुम्ही दोन सांगता. त्यांनी दोन सांगितले तर बंर होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

त्यांनी दोनच मागितले.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आमच्यासमोर एकच दिला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

दोन दिले. मी दुसरे सांगू इच्छितो. या सभागृहाने दि.२७/७/२००६ ला दोन विधी सहाय्यक घेण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिलेली.

**रतन पाटील :-**

साहेब, किती स्टे उठवले गेले.

**रोहिदास पाटील :-**

आपले काहीही काम होत नाही. मग महानगरपालिकेमध्ये ट्रेनिंग स्कुलं चालवायची आहे का?

**रतन पाटील :-**

आपल्या महापालिकेच्या कामाची पद्धत काय आहे? आपले एवढे वकिल आहेत. आपण विधी सल्लागाराची नेमणूक केली. आता, कशासाठी हे सहाय्यक घ्यायचे. जनतेच्या डोक्यावर बोजा.

**रोहिदास पाटील :-**

सहा महिने काम करू दे. काम करताना. काम अडचण आली. तर त्यांना निवेदन करू दे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

यामध्ये प्रशांत कारेगांवकर हे पाच वर्षाचे अनुभवी आहेत. तर, कमीत कमी एक तरी घ्यायला हरकत नाही.

**गिता जैन :-**

साहेब, मला एवढे सांगा. आपल्याकडे आता जे विधी सल्लागार आहे त्यांचा अनुभव काय आहे? किती वर्षाचा आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

विधी सल्लागार हे पद आपण कायम निर्माण केलेले होते. आणि कायम पदावर त्याची नियुक्ती केलेली आहे. आज ज्यावेळेस मी एम.पी.सी कडून सिलेक्ट झालो होतो तेव्हा माझ्याकडे काही अनुभव नव्हता. मी तुम्हाला सांगतो. कोणाला काम करायची संधी दिली. थोडा विश्वास दिला तर एक वर्षाभरामध्ये त्या मॅडमचे कामकाजाचे तुम्ही अप्रिशीएट करणार मी त्यांचे मोठे पण सादर करत नाही. ते लॉ ग्रॅज्युएट आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, या सभागृहाने काय सांगितले होते या सभागृहामध्ये ठरले होते की त्यावेळेचा आपणच होता. त्यावेळेला असे ठरले होते की, आपण रिटायर जज म्हणून घेउु या की, त्याचा त्याला अनुभव आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

असे नाही. मा. महासभेने या पदासाठी ज्या अर्हता निश्चित केलेल्या आहेत. त्याच्यासाठी जी प्रोसिजर आहे ते करुन ओपन पेपरमध्ये जाहिरात दिली होती. आपल्याकडे भरपूर लोकांनी अर्ज केले होते त्यामध्ये त्या

मॅडम ची निवड झाली आणि मा. महासभेला ती निवड सबमिट केल्यानंतर चर्चा केल्यानंतर मा. महासभेने मान्य किले. आता, आपल्याला त्याच्यावर चर्चा कशी करता येते?

**रतन पाटील :-**

त्या संदर्भात बोलायची गरज नाही.

**रोहिदास पाटील :-**

चर्चेवर चर्चा होवून जाते. एवढी पण ती चर्चा नाही.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मला सांगायचे हे आहे की, त्यांना काम करु दया. आणि निश्चितच....

**रतन पाटील :-**

साहेब, खोदून काढायचे असेल तर आम्ही पण काढू शकतो. आम्ही त्या विषयावर बोलत नाही.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मुद्दा समजून घेतला तर आपण चांगली चर्चा करून घेवू. यामध्ये त्यांनी आज जे वर्गीकरण केलेले आहे. कामाचे नियोजन केलेले आहे. आपल्याला अजून एक-दोन महिन्याने चांगले निश्चित फळ मिळेल.

**रतन पाटील :-**

बघू या. एक-दोन महिन्यानंतर बघू या. कशा पद्धतीने काम होतात. त्यांना गरज लागली असेल तर दवा देवू या. सहा महिन्याने जावू दया.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे काय कुणाच्या कामासाठी केलेला नाही.

**रतन पाटील :-**

या जनतेच्या डोक्यावर बोजा आहे. अजून किती पाहिजे.

**जयंत पाटील :-**

कोरगांवकर हे एक्सपिरीयन्स वाले आहेत. आम्ही त्यांनाच अलाऊड करतो. बाकीचे तुम्ही अनुभवी बघा.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या विभागाला आपण न्याय दयावा. त्यासाठी आपण प्लॅनिंग केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपण कोणत्या विभागावर अन्याय केलेला आहे.

**रतन पाटील :-**

या महापालिकेला न्याय मिळत नाही.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

विधी विभाग सक्षम पणाने कार्यान्वित नव्हता. आपण इथे इस्टॅब्लिश केलेले आहे. आपण असे म्हणत नाही की न्याय द्यावा. म्हणजे काही वेगळे करायचे नाही. त्याला त्या कामाचा...

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, या महापालिकेमध्ये आता पर्यन्त एक ही केस आमचे वकिल जिंकलेले नाही.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे बघा, आपल्याला रेकॉर्ड आपल्याला दाखवतो.

**जयंत पाटील :-**

हा माझा आरोप नाही. ही खरी गोष्ट आहे. मोघे बाईंचा पुढे जो विषय येतो. त्याचे काय? आपण हरलेलोच आहोत ना.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मोघेबाई आपली दुश्मन नाही. तो विषय वेगळा आहे.

**जयंत पाटील :-**

विषय वेगळा आहे. आपल्या महापालिकेच्या विरोधात ती कोर्टात गेली. तर आपल्या वकिलाने काय केले?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्याबद्दल मी आपल्याला बोलतो.

**जयंत पाटील :-**

आपण सांगा की, ह्या मॅडमने अजूनपर्यंत किती केस जिंकलेत? आम्हांला एक उदा. द्या.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पुढे येण्या-या काळात ते सांगतील.

**जयंत पाटील :-**

एम.आर.टी.पी. ची एकही केस आपण जिंकलेलो नाही. आम्ही शेकडो केसेस दिले. त्यावेळेला मॅडम नव्हत्या.

**रतन पाटील :-**

त्यांच्यावर आक्षेप नाही. पण, ही वस्तूस्थिती आहे.

**जयंत पाटील :-**

एम.आर.टी.पी. ची केस अनधिकृत बांधकाम विभाग आमचे वकिल आपली बाजू लढवत नाहीत. आपले विरोधी लढतात. आपले पैसे घेवून...

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यासाठी आपल्याला थोडी .....

**जेन्वी अल्मेडा :-**

मॅडम, ही मागणी आपली आहे. म्हणजे मॅडम, खरोखर चांगल्या कामाला लागलेले आहे. त्यांच्या अनुभवानुसार त्यांनी मागणी केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

आम्ही त्याबद्दल म्हणत नाही. पण, आपण अनुभवी घ्या ना.

**जेन्वी अल्मेडा :-**

पाच वर्षाचा अनुभव आहे तर घ्या आणि मॅडम, हा विषय पुन्हा दोन महिन्याने येईल. मग, तुमच्या कामकाजाची पध्दत आम्ही बघू.

**रोहिदास पाटील :-**

त्यांच्याकडे १९९६ पासून अतिक्रमणची एक केस आहे. १९९६ चा स्टे आपल्याला लागू राहील.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

काका, कोर्टाचे असे आदेश असतात.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही त्याच्यासाठी इकडे आहोत.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पुढच्या तारखेपर्यंत डब्लू.एस. फाईल करेपर्यंत काही स्पेसिफिक डेट देतात.

**रोहिदास पाटील :-**

त्यांचा जो अनुभव आलेला आहे तो आम्हाला सांगा. एक अतिक्रमण विभागाची एक केस त्यांच्याकडे गेली किंवा अतिक्रमण विभागाने ह्यांच्याकडे सल्ला मागितला. ती केस अशी आहे की, सोसायटी बनली २००० साली ह्यांच्याकडे स्टे आहे १९९६ चा सोसायटीने भिंत घातली. सोसायटी झाली १९९८ साली. भिंत घातली २००० साली आणि ते शेड बनते ते २००१ साली आणि १९९६ सालीचे स्टे दाखवतात. कसे काय कामकाज आहे?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने उत्तर देते की, हा जो दावा दाखल झालेला आहे तो २००६ मध्ये दाखल झालेला आहे आणि त्याच्यामध्ये आता स्टेटेस्को हे १९९६ सालातले नाही. त्याच्यामध्ये आपटे मॅडम, अपियर होता म्हणजे आपला स्टेबॅक होईपर्यंत स्टेटेस्को दिलेला आहे.

**जयंत पाटील :-**

स्टेटेस्कोचा अर्थ काय?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

स्टेटेस्को म्हणजे वादी आणि प्रतिवादी.

**जयंत पाटील :-**

आम्हाला हेच म्हणायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

जे आहे ते होत नाही ना. म्हणून त्याच्यासाठी हा विषय आहे.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, प्रश्न असा आहे की, मगाशी मॅडम यांना विचारले की, स्टेटेस्को म्हणजे काय? स्टेटेस्को फक्त आम्हाला असतो. म्हणजे आम्ही तिकडे जायचे नाही. एखादा बिल्डर प्लीन बांधतो. प्लीन तयार करतो. कोर्टात जावून स्टेटेस्को घेतो आणि स्टेटेस्कोचा अर्थ की, आम्ही जावू नये. तो त्याच्या बिल्डींगमध्ये चार-पाच माळे उभे करतो. लोकांची भरती करतो. सगळे पैसे घेवून मोकळा. मग, आपले वकील काय करताय?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी पूर्वी एक्सप्लेन केल्यासारखे, काकांनी जो विषय मांडला. आपण डब्लू.एस. दाखल करेपर्यंत स्टे आहे. तो दाखल केला तर स्टे वॅकेट होते.

**रतन पाटील :-**

साहेब, स्टे वॅकेट होण्यासाठी प्रयत्न करत होतो.

**एस. ए. खान :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण डब्लू.एस. फाईल करत नाही. ते स्टे परमनन्ट होवून जाते. तुम्ही डब्लू.एस. फाईलच करत नाही. डब्लू.एस.ला दोन-तीन तारखा भेटतात.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पुढच्या कामकाजामध्ये निश्चित फरक पडेल ना.

**जयंत पाटील :-**

साहेब, एक तरी बिल्डींगचा तोडायला कोर्टातुन निर्णय आणा.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर, मी आपल्याला एक उदाहरण देवू शकते. आपल्या बाजूने एक निर्णय लागलेला आहे. बी.पी. रोडला जागृती नावाची बिल्डींग आहे. ती रोड वाईडिंगमध्ये येते. तर, त्या बिल्डींगचा निर्णय आपल्या बाजूने लागलेला आहे.

**जयंत पाटील :-**

मॅडम, त्या बिल्डींगमध्ये एक मोठे वकील राहतात. जास्तीत जास्त श्रेय आपल्या महापालिकेला त्यानेच घेतलेले आहे.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण एकदा स्टे दाखल केल्यानंतर तो स्टे व्हॅकेट होतो. त्याच्यामुळे पुढच्या कामकाजात फारसा फरक पडणार नाही.

**सई वडके :-**

बी. पी. रोडला जी जागृती नावाची बिल्डींग आहे त्याचा निर्णय आपल्या बाजूने लागलेला आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, त्यांनी महापालिकेच्या विरोधात स्टे घेतलेला आहे.

**रतन पाटील :-**

ती लोकं बांधकाम तोडायला निघालेली आहेत.

**सई वडके :-**

सर, अजुन हातामध्ये ऑर्डर कॉपी आलेली नाही. त्यांना नोटीस देवून त्या नोटीसमध्ये आपण असे म्हटले होते की, एफ.एस.आय आणि टी.डी.आर देण्यात येईल. रोड बाईंडींग मध्ये त्यांची जागा जाते. पुर्ण बिल्डींग जाते.

**जयंत पाटील :-**

मॅडम, आपण ज्या इमारती संबंधित बोलतात ना. ती इमारत ग्रामपंचायत च्या काळात झालेली आहे. ती इमारत महापालिकेच्या काळात झालेली नाही. नगरपालिकेच्या काळात झाले. आम्ही म्हणतो नगरपालिकेच्या काळामध्ये आज चालू आहेत अनधिकृत बांधकामे ती इमारत तोडून दाखवा मी ग्रामपंचायतीच्या काळापासून विचारतो.

**गिता जैन :-**

मॅडम, ऑफिसमध्ये जावून बघणार आणि स्टे ची लिस्ट काढा. स्टे जर मिळाला असेल तर त्या बिल्डींगमध्ये प्रत्यक्ष जावून बघा ती बिल्डींग पूर्ण असणार.

**एस. ए. खान :-**

काही ठिकाणी त्यांची जागा नसताना सुद्धा ते क्लेम करतात. की, ही माझी मालकीची जागा आहे. त्यांची पण चौकशी करायला पाहिजे नुसते खोटे दाखले करतात.

**हंसुकुमार पांडे**

साहब, अपने सर्व्हिस रोड पे कितना अतिक्रमण हुआ है। सर्व्हिस रोड बनाया नाही। उसके जगह अतिक्रमण होगया। उसका क्या हुआ? मा. महासभे मे भी हुआ था और मेयर मॅडम ने भी बोला था की, उसको इमिजिएटली ॲक्शन लिया जायेगा।

**जयंत पाटील :-**

मी तुम्हाला एक उदाहरण देतो. एक इमारत १०० टक्के अनधिकृत बनली गोडदेव स्मशानासमोर त्या माणसाने सगळ मॅनेज केले. तिथे इमारत तयार झाली. मग त्या इमारतीला लोन मिळण्यासाठी बाजुच्या इमारतीची डॉक्युमेंट वापरली. ती इमारत बाजुला अप्रोच होती. अशामुळे काय झाले की, त्या इमारतीची केस केली. तर ही जी बाजुची इमारत आहे. त्या माणसाच्या सेक्टरवर केस झाली.

**एस. ए. खान :-**

आपल्या अधिकाऱ्याने चौकशी करायला पाहिजे. मी विधी सल्लागाराला तेच सांगतो की, ते खोटे कागदपत्रे दाखल करतात. सात बारा आणि त्याचे रिपोर्ट, तर ते जे दाखल करतात आणि आपल्याकडे येतात. तर आपण एका कोर्टाला सांगायचे की, हे कागदपत्रे खोटे आहेत. त्याची चौकशी होवू द्या. नंतर एक्सीबेट करा. नंतर निर्णय द्या. असे आपल्या वकिलाने सांगायला पाहिजे. खोटे कागदपत्रे दाखवून ते लोक स्टे घेतात

आणि आपण बसून बोलतो की स्टे झालेला आहे. आपण काही करू शकत नाही. नागरिकांना पाणी मिळत नाही. नागरिकांना रस्ते मिळत नाही.

**गिता जैन :-**

मॅडम, तुम्ही कधीपासून चार्ज घेतलेला आहे?

**सई वडके :-**

२६ जुन ला.

**गिता जैन :-**

२६ जुनला तर आतापर्यंत आपल्याकडे किती केस पेंडींग आहेत.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

तुमच्याकडे टोटल विभागाच्या केसचे वर्गीकरण करा. त्यामध्ये प्रायोरिटी निश्चित करुन त्या स्टे वॅकेट करण्यासारखे गोष्ट आहे फाईल सबमिट करणे एक्सीबीट करणे.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, प्रायोरिटी सर्व्हिस रोडमध्ये आहे. साहेब, प्रायोरिटी सर्व्हिस रोडला द्या. चार करोड रुपये पास होवून आले.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

निश्चित त्यामध्ये चांगली शिफारस होईल.

**रोहिदास पाटील :-**

साहित्य कशासाठी घेतले?

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

तुमचा अहवाल दोन - तीन महिन्यात सादर होईल.

**हंसूकुमार पांडे :-**

सर्व्हिस रोडचा द्या.

**एस. ए. खान :-**

किती लोकांना खोटं ठरवले? तसा रिपोर्ट द्या.

**हंसूकुमार पांडे :-**

मा. सभापती साहेब, सर्व्हिस रोड बद्दल बोला. सर्व्हिस रोडला प्रायोरिटी दयाना. मिरारोडच्या सर्व्हिस रोडला. दोन्ही बाजूला सर्व्हिस रोड आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्या प्लॅनमध्ये तो आहे.

**हंसूकुमार पांडे :-**

पण, साहेब तिकडे तर बिल्डिंग बनली ना. आणि परवानगी आपणच देतो ना.

**एस. ए. खान :-**

कधी तोडणार?

**रतन पाटील :-**

आरक्षणाच्या जागेमध्ये किती बिल्डिंग झालेले आहेत. भरपूर झालेले आहेत.

**हंसूकुमार पांडे :-**

साहेब, जरा खुलासा करा.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

सर्व्हिस रोडवर भरपूर चर्चा झालेली आहे. तर आज तो विषय इथे थांबवा.

**हंसूकुमार पांडे :-**

साहेब, मा. महासभेमध्ये विषय घेतलेला आहे.

**रतन पाटील :-**

हॉस्पिटलचे आरक्षण आहे त्याच्यावर सुद्धा अतिक्रमण झालेले आहे. विधी सल्लागांराना एक विचारु इच्छितो. आपल्याकडे मागच्या वेळेला ३८,०००/- रु. कायदयाची पुस्तके खरेदी केली. ती कायदयाची पुस्तके आपल्याकडे आहे का? आणि किती आहे? आपल्याकडे ३८,०००/- रु. ची कायदयाची पुस्तके जमा आहेत का?

**सई वडके :-**

पुस्तके आहेत.

**रतन पाटील :-**

सगळी पुस्तके बरोबर आहेत.

**सई वडके :-**

३८,०००/- रु. ची नाही.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे पुस्तके किती आहेत? किती कमी आहेत?

**सई वडके :-**

२००३ साली जी पुस्तके खरेदी केलेली आहे त्याची पुस्तके आहेत.

**रतन पाटील :-**

किती आहेत? सगळी आहे का?

**सई वडके :-**

३८,०००/- रु. ची घेतलेली आहे. ते मला यादी बघायला लागेल.

**रतन पाटील :-**

आपल्या महापालिकेने कायदयाची पुस्तके ३८,०००/- रु. ची खरेदी केलेली आहे.

**एस. ए. खान :-**

कधी घेतलेली आहेत?

**रतन पाटील :-**

मॅडम, सांगतात ना. आपल्याकडे साळवे हे विधी सल्लागार होते. ह्यांनी जी खरेदी केलेली ती पुस्तके आपल्याकडे नाही. त्याची अर्धी पुस्तके इकडे आहे. आणि अर्धी पुस्तके अन्य ठिकाणी आहे. म्हणून विधी सल्लागांराना विचारले की, आपल्याकडे पूर्ण पुस्तके आहेत का? जर, आपल्या महापालिकेने कायद्याच्या पुस्तकाला खर्च केलेले आहेत. सर्व पुस्तके आपल्याकडे आहे का?

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मी, तपासून घेतो.

**रतन पाटील :-**

नक्की? सगळच साहेब तपासायला लागले तर काही काम होणार नाही आहे.

**हंसूकुमार पांडे :-**

मा. उपायुक्त साहेब, सर्व्हिस रोडचा खुलासा करा.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

पुढच्या वेळेला.

**हंसुकुमार पांडे :-**

त्याला प्रायोरिटीमध्ये घेणार काय?

**मा. सभापती :-**

घेणार पण आपण नंतर चर्चा करु.

**प्रकरण क्र. १०० :-**

विधी विभागात मानधनावर विधी सहाय्यक (Legal Assistant) नेमणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. १०२ :-**

मा. स्थायी समिती सभा दि. २७/०६/२००६ ठराव क्र. ६५ अन्वये विधी सहाय्यक नेमण्यासत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीस अनुसरून विधी सहाय्यक (Legal Assistant) या पदाकरीता खलील उमेदवारांनी मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शेक्षणिक पात्रता | अनुभव | नमुद मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. हेमाली अमरनाथ वर्दे | बी.ए.एल.एल.बी | २ वर्षे | रू. ९,०००/- |
| २ | श्री. जितेंद्र डाके | बी.ए.एल.एल.बी | २ वर्षे | रू. १०,०००/- |
| ३. | श्री. राकेश एच पांडे | बी.ए.एल.एल.बी | १ वर्ष | मानधन नमुद केलेले नाही. |
| ४ | श्री. प्रशांत एम कोरगावकर | बी.कॉम.एल.एल.बी | ५ वर्षे | रू. ९,०००/- |
| ५ | श्री. विपुल बी. जैन | एल.एल.बी. | १ वर्ष | मानधन नमुद केलेले नाही. |

वरील पाच उमेदवारांपैकी अ.क्र. ३ व ५ च्या उमेदवारांना विहित अनुभव नाही. अ.क्र. १, २ व अ.क्र. ४ च्या उमेदवारांना विहीत अनुभव प्राप्त आहे. त्यापैकी अ.क्र. ४ च्या उमेदवाराची रू. ९,०००/- प्रति महिना मानधनावर पाच महिन्याकरिता नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. अ.क्र. १ च्या उमेदवाराची आवश्यकता असल्यास तीन महिन्यानंतर पून्हा मा. स्थायी समिती सभेपूढे विषय ठेवावा.

**सुचक :- श्री. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्रीम. जयंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १०१ चे वाचन केले.)

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

या विषयाच्या अनुषंगाने मी खुलासा करतो. डॉ. श्री. पडवळ हे आपल्याकडे आहेत. आणि त्यांची जी मुदत आहे. ती पुर्ण झालेली आहे. आणि त्यांना एक्सटेन्शन देण्यासाठी प्रशासनाने हा अहवाल दिला. म्हणून हा विषय घेतला होता. पण, कालच राज्य शासनाकडून वर्ग-१ ते जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यरत असलेले यापूर्वीचे इतर डिस्ट्रिक्टमध्ये काम केलेले होते. त्यांची आपल्याकडे नियुक्ती झालेली आहे. तसे आदेश प्राप्त झालेले आहे. आणि मी सभागृहाला या प्रस्तावामध्ये थोडी सुधार करण्यासाठी विनंती करतो. आजपर्यंत डॉ. पडवळ यांनी जे कामकाज केलेले आहे. त्या कालावधीच्या मानधनासाठी मान्यता द्यावी. आणि पुढच्या एक्सटेन्शनची याठिकाणी सध्यातरी आवश्यकता नाही.

**शशिकांत भोईर :-**

द्यायला पाहिजे ना. जर, समजा ते कुठेपण असतील तिथे सोडवतील व ते तत्पूर्वी राहतील. त्यांची मुदत असेल तो पर्यंत द्या. त्यांचे एक्सटेन्शन करुन द्या. कारण, त्यांच्यावर अन्याय व्हायला नको. आपल्याकडे आले म्हणून ताबडतोब त्यांना दुसऱ्या ठिकाणी रुजू करू. माझी सभागृहाला विनंती आहे. त्यांचा जेवढा टाईम पिरेड आहे. तेवढे त्यांना ठेवा. नंतर त्यांचा विषय आणू नका. मुदतवाढ द्यावी.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये मी, सन्मा. सदस्यांना माहिती देवू इच्छितो की, कालच शासनाकडून एक डेप्यूटेशन वरती वैदयकिय अधिकारी आलेले आहे. आणि जो काही डॉ.पडवळांचा कालावधी आहे. डॉ. पडवळ यांनी जिथपर्यंत त्या पदावर त्यांनी काम केलेले आहे. त्या पदावरचा पगार, मानधन काय असेल ते आपल्याला द्यावेच लागणार आणि त्याच्या नंतर जे नविन अधिकारी आलेले आहे. त्या नविन अधिकाऱ्याला रुजू करुन घेणार आहोत.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्यांना रुजू करून घ्या. तत्पूर्वी त्यांना मुदतवाढचा विषय आहे. तो पर्यंत मुदत द्या. नंतरची मुदत देवू नका. आता आपण जी मुदत दिलेली आहे किती महिन्यासाठी तिथपर्यंत ठेवा. त्यानंतर नका देवू.

**मा. आयुक्त :-**

तेच ना. म्हणजे आता नविन अधिकारी आलेले हजर झालेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

राहू द्या ना. त्यांचे वेलकम. तुम्ही तुमचे प्रयत्न केले तर आणि आपल्याला प्रतिनिधी डॉक्टरला आणले. आता आपले घनकचरा प्रकल्प आहे. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनेक हजारो रोग पसरतात.

**मा. आयुक्त :-**

एकाच पदावर दोघांना ठेवता येणार नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, आरोग्य अधिकारी हे पद एक आहे की, सहाय्यक आहे? काय आहे?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, कायद्यात तशी तरतुद असेल तर पुर्तता करत येत असेल तर त्यांना पाच महिन्याचे एक्सटेन्शन द्या ना. तोपर्यंत ते ही ट्रेन होतील. आणि यांची ही सोय होईल.

**बालाजी खतगांवकर मा. उपायुक्त (मु.) साो. :-**

मी त्याचा खुलासा करतो. एका पदावर दोघांना घेता येत नाही. आपल्याकडे दुसरे पद रिक्त आहे. सहाय्यक वैदयाकिय म्हणून..

**मा. आयुक्त :-**

नविन जे अधिकारी आलेले आहे ते त्यांना असिस्ट करतील.

**जेन्वी अल्मेडा :-**

त्यांना एवढया महिन्यांचा अनुभव आहे.

**जयंत पाटील :-**

सहाय्यक कोण राहिल? डॉ. पडवळ यांचा मानधन कमी करणार काय? ३० हजार रू. प्रति महिना मानधन देतो. ते तुम्ही कमी करणार का?

**जेन्वी अल्मेडा :-**

३० हजार रु. प्रति महिना आहे. मग, आता सहाय्यकमुळे कमी करणार?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की, आपण बऱ्याच दिवसापासून शासनाकडे सारखा पाठपुरावा करतो आणि आपण जी काही आरोग्य केंद्रे चालू केलेले आहे. त्या आरोग्य केंद्रावर जो कर्मचारी वर्ग आपण उपलब्ध केलेला आहे. त्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी सेवेमध्ये घेण्याबद्दलचा जो प्रस्ताव होता तो शासनानी मान्य केलेला आहे आणि ६४ पदांना आपल्याला मंजुरी सुद्धा मिळालेली आहे. त्यामुळे आज जे ठेकापद्धतीने घेतलेले आहे ते सगळ्याच सदस्यांना आपण कायम करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

साहेब, तो प्रश्न नाही. आता आपले वैद्यकीय अधिकारी डॉ. पडवळ साहेब आहेत आणि त्याच जागेवर आपण दुसऱ्यांना घेत आहोत आणि मग सहाय्यक कोणाला करणार? सहाय्यक जर डॉ. पडवळ यांना केले तर यांचे मानधन कमी करणार का?

**मा. आयुक्त :-**

कोणाचे?

**जयंत पाटील :-**

डॉ. पडवळ साहेबांचे.

**मा. आयुक्त :-**

मानधन कमी करायची गरज नाही.

**जयंत पाटील :-**

कारण, ते वैद्यकिय अधिकारी आहे. आपण त्यांना सहाय्यक करताय.

**मा. आयुक्त :-**

मानधन कमी करायचा प्रश्नच येत नाही. मानधन जे ठरवलेले आहे ते तुम्ही ठरवलेले आहे. त्यामुळे सहाय्यक पदावर तेच मानधन आपण देणार.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्यांना दुसरी पोस्ट देता ना.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही दिलेले आहे. तुमच्या तांत्रिक बाबीमध्ये ते आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

मी तुंम्हाला खुलासा करुन देतो. त्यांना पुर्वी मानधन दिलेले सुद्धा आपण त्या पदाचे मानधन दिलेले नाही. त्याच्यापेक्षा कमी दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्यांना कमी का दिले?

**रोहिदास पाटील :-**

त्यांना अडचण येणार नाही. असे बोला. आणि विषय संपवा.

**मा. आयुक्त :-**

अजिबात अडचण येणार नाही. माझ्यावर सोपवून द्या.

(सन्मा. सदस्य ग्रिटा फॅरो यांनी प्रकरण क्र. १०१च्या ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १०१ :-**

डॉ. प्रमोद वि. पडवळ यांची आरोग्य अधिकारी पदावर नव्याने नेमणूक देणेबाबत मान्यता देणे.

**ठराव क्र. १०३ :-**

डॉ. आर. आर. राठोड हे दि. ४/१०/२००६ रोजी मध्यान्हीनंतर शासन आदेशानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून रूजू झाले आहेत. त्याआधी मा. स्थायी समितीच्या ठरावानुसार डॉ. प्रमोद पडवळ हे वेद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांची मुदत दि. १९/८/२००६ रोजी संपलेली आहे. तरी डॉ. प्रमोद पडवळ यांना एक दिवसाचा खंड देउन दि. २१/८/२००६ ते दि. ४/१०/२००६ पर्यंत नव्याने वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून नेमणूक देण्यात येत आहे. तसेच डॉ. राठोड यांची वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून नेमणूक झाल्यामुळे डॉ. प्रमोद पडवळ यांची सहाय्यक वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून पूर्वीच्याच मानधनावर दि. ५/१०/२००६ पासून नेमणूक करावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- सौ. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १०२ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

साहेब, रत्नप्रभा मोघे मॅडम, यांचे आपण आभार मानले पाहिजे. आपल्या विरोधात कार्टामध्ये जातात आणि जिंकूनही येतात. आता, आम्ही दोन ॲडव्होकेट वाढवले. प्रश्न असा आहे की, शासनाच्या विरोधात शासनाने निर्णय दिला होता त्या विरोधात त्या कोर्टात गेल्या व कोर्टाने निर्णय दिला की, २४० पुर्ण दिवस भरल्यानंतर तेव्हा पासुन त्यांच्या ज्या काही सुविधा आहेत. कोर्टाच्या आदेशा विरोध आपण करु शकत नाही. हे आम्हाला मान्य आहे. पण, हाच न्याय जर कोर्टात गेला नाही. ५३७ कर्मचारी आज आपल्याकडे इतकी वर्ष आहेत. आता ते म्हातारे व्हायला आले. त्यांना आम्ही न्याय देवु शकत नाही कारण ते कोर्टात गेले नाही. ते अजुन ही त्या परिस्थितीमध्ये आहे. आपल्या सर्वांची प्रतिष्ठा सांभाळून आपल्या विरोधात न जाता इमाने इतबारे काम करत आहे. ते अजून सफाई कामगारच आहे. मग, त्यांना न्याय कधी मिळणार की, त्यांनी कोर्टात जायला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

त्यांना पण न्याय द्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

त्यांना न्याय कोणी द्यायचा? आणि हाच फॅक्टर त्यांना जर लावला तर त्यांना उद्या तुम्हाला न्याय द्यावा लागेल.

**शशिकांत भोईर :-**

मग, आपल्याला त्यांना कोर्टामध्ये पाठवायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये मी खुलासा करु इच्छितो, की जे रत्नप्रभा मोघे आणि त्यांच्या बरोबरचे ५३८ कर्मचारी आहेत. ५३८ कर्मचा-यांच्या बाबतीमध्ये आपण जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. ते या सन्मा. सदस्यांना स्थायी समितीला मी असे सांगू इच्छितो की, ५३८ कर्मचा-यांच्या बाबतीमध्ये जी काही सेवा ज्येष्ठता दिनांका बाबत त्यांची जर मागणी असेल की, आम्हाला सुद्धा त्यांच्याप्रमाणेच ती डेट द्यावी. परंतु, या बाबतीमध्ये शासनाने जे काही आदेश दिलेले आहे. ५३८ कर्मचा-यांच्या बाबतीमध्ये त्या बाबतीमध्ये सुद्धा स्थायी समितीमध्ये ब-याचवेळा चर्चा झालेली आहे. तो निर्णय आपण मान्य केलेला आहे. म्हणजे माझ्या माहितीप्रमाणे ५३८....

**जयंत पाटील :-**

१ जून २००० पासून शासनाचा निर्णय आहे. आणि त्यांना आपण सामावून घेतले. परंतु, त्यांनी जी सेवा केली. १९९०, १९९१ पासून केली. म्हणजे १० वर्षे त्यांनी सेवा केली. म्हणजे १० वर्ष त्यांचे तसे नुकसान झाले. आणि पुन्हा शासनाचा आदेश त्यांना लागू होतो. पण त्या मोघे बाईंना लागू होत नाही.

**शशिकांत भोईर :-**

त्यामध्ये १०/३/२००० पूर्वी चे दाखवले. ह्याच्यामध्ये समाविष्ट करु नये. असे दिले होते.

**एस. ए. खान :-**

त्यांनी पूर्वीचे दाखवले. पूर्वीचे म्हणजे काय?

**शशिकांत भोईर :-**

मोघे मॅडमला आपण जो फायदा देणार आहोत. तो त्यांना पण देणार आहोत. जेवढे मोघे मॅडमला देणार तेवढया सगळ्यांना द्या.

**एस. ए. खान :-**

सविस्तर विषय घ्या.

**मा. आयुक्त :-**

शासनाने या बाबतीमध्ये जे काही आदेश दिले ते आदेश आपल्याकडे आहेतच आणि शासनाने सांगितले की, त्यांना कुठल्या तारखेपासून कायम करावे. त्या बाबतीमध्ये शासनाने आपल्याला आदेश दिलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

शासनाने जे दुसरे आदेश दिले. आपण १९९६ चे घेतो ना. शासनाच्या विरोधात त्या गेल्या ना. जसा कोर्टाने निर्णय दिलेला आहे तसा त्यांना पण लागू असावा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण इथे सर्व बोलतो. कोर्टाने आदेश दिलेले आहे का? ते आपण बघायचे की नाही. ते आपल्या ह्याच्यात आहे.

**जयंत पाटील :-**

कोर्टाच्या आदेशाला आम्ही चॅलेन्ज करत नाही.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, आपण चॅलेन्ज करू शकतो. विरोधात जावू शकतो.

**रतन पाटील :-**

हे बघा आपण कोर्टाचे आदेश नाकारू शकत नाही.

**एस. ए. खान :-**

आपण विरोधात जावू शकतो.

**शशिकांत भोईर :-**

जेव्हा मोघे बाईंना निर्णय दिला. त्यानंतर आपले विधी सल्लागार पुढे केस करणार आहेत का? त्यांच्या विरुद्ध. आपली पुढची हालचाल आहे का? त्याचा ही त्यांनी खुलासा करावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

मी सभागृहाला माहिती देवू इच्छितो ५३८ कर्मचा-यांच्या सोबत मोघे मॅडम कार्यरत होत्या.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण असे कोर्टाचे निर्णय नाकारु शकत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

५३८ कर्मचा-यांच्या सोबत मोघे मॅडम सुद्धा या ठिकाणी कार्यरत होत्या. शासनाकडे हा प्रस्ताव ज्यावेळेस कायम झाला त्यामध्ये मोघे मॅडमचा समावेश झालेला नाही. म्हणून त्यांनी महापालिकेच्या आणि शासनेच्या विरोधात लेबर कोर्टामध्ये दावा दाखल केला होता. आणि त्या ५३८ सोबत कायम झालेल्या नव्हत्या म्हणून त्या लेबर कोर्टात गेल्यानंतर लेबर कोर्टामध्ये निर्णय घेतला की, ह्याचे २४० दिवस ज्यावेळेस पूर्ण होतात. त्यांच्या कामकाजाला तेव्हापासून त्यांना कायम पणाचे फायदे द्यावे. किंवा कायमपणच्या बेनिफिटवर त्यांना कायम करुन घ्यावे. पण हा विषय सुद्धा मागच्या निर्णयानंतर स्थायी समितीसमोर सादर केला असता तर स्थायी समितीने त्याला मान्यता दिली आणि ज्या तारखेला निर्णय झाला. त्या तारखेपासून त्यांना कायम करावे. आणि त्याप्रमाणे आपण त्यांना कायम केले होते. पण, सदर कोर्टाच्या निर्णयाचा अवमान झाला म्हणून प्रशासनाच्या विरोधात कन्टेम्प्ट दावा दाखल केला होता आणि त्या कन्टेम्प्ट दावाच्या निर्णयाप्रमाणे हा विषय आपल्यासमोर आणलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुम्ही आम्हाला अगदी गोलमाल उत्तर देता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

सन्मा. सदस्य साहेब, गोलमाल कसे म्हणता जी फॅक्ट आहे. आपल्या समोर मांडलेली आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्या गोषवारामध्ये आहे. प्रश्न आम्ही ५३८ लोकांचा करतो. तुम्ही रत्नप्रभा मोघे मॅडम, संबंधी बोलता आम्ही ५३८ लोकांना तो निकष न्याय का लावत नाही? हा प्रश्न झाला. दुसरी गोष्ट अशी आहे. या मोघे बाईंना कोर्टाने आदेश दिला की, त्यांना लिपिक या पदावर घ्या कोर्ट कशाला आदेश देवू शकतो की, त्याला लिपिक म्हणून घ्या. कोर्टाला तो अधिकार नव्हता. आपले वकिल त्यावेळेस काय करत होते. ५३८ लोक जिंकले जे आज सफाई कामगार आहेत. त्या लिपिक होवू शकतात. तर मग, हे का सफाई कामगार होतात.

**रोहिदास पाटील :-**

मा. खतगावकर साहेब तुम्हाला ह्याची सत्यस्थिती माहिती नाही. सभागृहास आलेले आहेत तर सत्यच आले पाहिजे. ५३८ जे कर्मचारी आहेत ते अनेक वर्ष अस्थायी म्हणून काम केले. नंतर आपण त्यांना स्थायी केले. या मोघे बाई आहेत त्या अमुक वर्ष कलेक्टर कचेरीत काम करित होत्या. त्याच्यानंतर त्या आपल्याकडे आल्या. ती स्थिती आहे. आमची विनंती काय आहे की, ज्यांना ही धोरणत्मक बोलतो. त्यांना मी विरोध करत नाही. पण ५३८ कर्मचा-यांना न्याय देण्यासाठी आपण मागे का पडतो, आपल्याकडून असे का कर्तव्य होत नाही? मा. आयुक्त साहेबांचे मा. सभापती साहेबांचे स्थायी समितीच्या सदस्यांचे अन्य नगरसेवकांचे, साहेब, आपल हे कर्तव्य आहे. ५३८ लोकांना नियमानुसार न्याय मिळाला पाहिजे. आपण त्यांच्यांसाठी काम केले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. स्थायी समितीच्या भावना लक्षात घेवून मी स्थायी समितीला असे सांगु इच्छितो की, जो विषय पटलावर विषय आलेला आहे. त्या विषयाला आपण कृपया मान्यता द्यावी आणि आपण हा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे की, ५३८ कर्मचा-यांच्या बाबतीमध्ये महापालिकेने काही निर्णय घ्यायला घ्यायला पाहिजे. तर मी, स्थायी समितीला असे सुचवू इच्छितो की ५३८ कर्मचा-यांच्या बाबतीमध्ये जो काही शासनाच्या आहे असे तो आदेश आणि ५३८ कर्मचा-यांच्या बाबतीमध्ये सत्यस्थिती ह्या सगळ्यांच्या विचार करुन दोन आठवड्यामध्ये किंवा ही जी स्थायी समिती झालेली आहे. त्याच्यानंतर बरोबर तिस-या स्थायी समितीमध्ये मी हा विषय आणतो, विषय पटलावर विषय घेतो. आपण महासभेला रेकमेन्डेशन देवू या. मा. महासभेला ठराव करुन शासनाकडे पाठवून देऊया आणि शासनाकडून त्याचा पाठपुरावा करुन मंजुर करुन घेवू या.

**जयंत पाटील :-**

शासनाकडे पाठवायचे कारणच काय? ५३८ लोकांनी कोर्टात जावे का?

**रतन पाटील :-**

५३८ लोक कोर्टामध्ये जाणार आहेत. न्याय मिळाला नाही तर.

**एस. ए. खान :-**

आपल्या विरुध्द ते लोक कोर्टात जाणारच.

**जयंत पाटील :-**

हाच निकष पकडला तर एका क्षणात त्यांना न्याय मिळेल. पण ते कोर्टात जात नाही.

**रतन पाटील :-**

आपल्या महानगरपालिकेचा त्यांनी सन्मान ठेवलेला, आदर ठेवालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

कोर्टामध्ये जाण्यासाठी मा. महासभेच्या मंजुरीची गरज नाही किंवा स्थायी समितीच्या मंजुरीची गरज नाही. ५३८ कर्मचा-यांना वाटल तर ते परस्पर कोर्टामध्ये जातील.

**एस. ए. खान :-**

आपण मा. महासभेमध्ये मंजुरी देवू ना. त्यांना जर ॲडव्हाईस दिले कोर्टामध्ये जा तर ते कोर्टामध्ये जातील ना.

**शशिकांत भोईर :-**

आपल पण काहीतरी हित आहे. आपले पण कर्तव्य आहे ना.

**जयंत पाटील :-**

कर्मचारी कोर्टामध्ये कोणाच्या विरुध्द जाणार?

**एस. ए. खान :-**

आपल्या विरुध्द.

**जयंत पाटील :-**

ज्या ठिकाणी ते सर्व्हिस करतात. नोकरी करतात. त्याच आस्थापनेच्या विरोधात ते कोर्टात जातील. पण ते जात नाही तर आपण त्यांना सन्मान करायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

शेवटी औद्योगिक न्यायालय जे आहे किंवा लेबर कोर्ट जे आहे ते लेबर कोर्ट कर्मचा-यांसाठी शासनाने स्थापन केलेले आहे. कर्मचा-यांविरुध्द जे अन्याय होतात. त्या अन्यायाला दाद मागण्यासाठी कोर्टात जाणार आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, ते १९९०, १९९१ सालीचे ते कर्मचारी आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

लेबर कोर्टाने आदेश येतो त्याच्या विरुद्ध आपण कोर्टात जावू शकत नाही.

**एस. ए. खान :-**

आपण जावू शकतो. तुमचे म्हणणे बरोबर आहे. आपण विरोधात जावू शकतो.

**रतन पाटील :-**

५३८ जणांनी आपल्या महापालिकेच्या सभागृहाचा सन्मानच केलेला आहे. कोर्टात न जाता.

**एस. ए. खान :-**

आपण अपिलात जावू शकतो.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही याबाबत विधी सल्लागारांना खुलासा विचारा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

सौ. रत्नप्रभा मोघे बाई ५३८ कर्मचा-यांसोबत होत्या.

**जयंत पाटील :-**

आपण ह्यांना आस्थापनेवर घेतलेले आहे. आपण ५३८ कर्मचा-यांना २००० पासून आस्थापनेवर घेतलेले आहे. परंतु, त्यांच्यावर कोर्टाच्या निकालामुळे अन्याय झालेला आहे की, २४० दिवस भरलेल्या रत्नप्रभा मोघे बाईंना २४० दिवसानंतर परमनन्ट करतो.

**मा. आयुक्त :-**

५३८ कर्मचा-यांमध्ये त्या नव्हत्या.

**जयंत पाटील :-**

त्या होत्या.

**मा. आयुक्त :-**

नव्हत्या.

**रतन पाटील :-**

मॅडम, १९९६ साली आल्या. आणि ते कर्मचारी जूने आहेत. १९९०, १९९१,१९९२ सालीपासून ते आहेत.

**मा. आयुक्त :-**

मी असे बोलत नाही की, जे ५३८ कर्मचारी आहे त्यांनी औदयोगिक न्यायालय मध्ये जावू नये असे आपले म्हणणे नाही.

**जयंत पाटील :-**

त्यांनी जावे का?

**रतन पाटील :-**

आपले सभागृह जर निर्णय देणार असाल तर जावूच कशाला?

**मा. आयुक्त :-**

त्या बाबतीमध्ये शासनाने आपल्याला निकष ठरवून दिलेले आहे ५३८ कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये आपल्या शासनाने निकष ठरवून दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे. शासनाने निकष दिल्यानंतर कोर्टाने आणखीन निकष ठरवले.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीने मागच्यावेळी जो निर्णय घेतला त्या निर्णयाची अंमलबजावणी आपण केल्यानंतर हा मुद्दा उपस्थित झाला आणि कन्टेम्प्टचा कन्टेप्ट ॲप्लीकेशन दाखल झालेला आहे. ह्याच्यासाठी हा विषय आपण पुन्हा आणलेला आहे.

**जयंत पाटील :-**

रत्नप्रभा मोघे मॅडम, ह्या सफाई कामगार होत्या ना. त्याच्यानंतर त्यांना पदोन्नती देवून त्यांना लिपिक त्यांची नेमणुक करुन घेतलेली आहे. आणि ह्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती आपण अजून करून दिलेली नाही. ते अजून सफाई कामगार आहे. एका सफाई कामगाराला आपण न्याय देतो.

**मा. आयुक्त :-**

५३८ कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये आपल्या मनामध्ये काही राग आहे किंवा व्देश आहे अशातला काही भाग नाही. सगळे कर्मचारी आपल्याला सारखे आहे. महापालिकेमध्ये जे कर्मचारी काम करतात. ते सगळे सारखे आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, त्यांनी १० वर्ष फुकट घालवले.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, जयंत पाटील साहेब एखाद्या कर्मचाऱ्याला एक न्याय द्यायचा आणि दुसऱ्या कर्मचाऱ्याला दुसरा न्याय द्यायचा. हे तत्व आपल्याला पटत नाही.

**रतन पाटील :-**

पटत नाही. तर आपण निर्णय घ्या ना.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला या बाबतीमध्ये तेच सांगतो की, स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तशी टिपणी देवून पुढच्या सभेत घ्या.

**मा. आयुक्त :-**

मी, तुम्हाला तेच तर सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, ५३८ अशी एक टिपणी बनवा ना. ते मोघे आणि ५३८ अशी एक टिपणी होवू द्या ना.

**जयंत पाटील :-**

मोघे संबंधी आमचे म्हणणे नाही. आम्ही कोर्टाचा आदेश मान्य करतो.

**दिपक खांबित :-**

५३८ कर्मचाऱ्यांमधले लोक जे आहेत. ते १९९३ सालीपासून लिपिकाचे काम करायचे. त्यांचे काय म्हणणे की, आम्हाला सुद्धा १९९३ सालीपासून लिपिक करा. त्यांची एवढीच मागणी आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझ्याकडे सफाई कामगार आम्हाला लिपिक करा असे सांगायला आले. तर तुम्ही त्यांना लिपिक कराल का?

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे असे एकूण ९० कर्मचारी आहेत. जे सफाई कामगार होते आणि त्यांना लिपिक केलेले आहे. शिवाय, जे लिपिक आहेत त्यांना लिपिक पद दिले.

**शशिकांत भोईर :-**

या पण सफाई कामगार होत्या ना.

**दिपक खांबित :-**

सद्यस्थितीमध्ये असे नमुद नव्हते की ह्यांना आपण सफाई कामगारवरुन लिपिक केले.

**शशिकांत भोईर :-**

सेवाजेष्ठताप्रमाणे येतील ते.

**रतन पाटील :-**

सेवाजेष्ठता प्रमाणे व्हायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

साहेब, सेवाजेष्ठतामुळे ९ लोक लिपिक झाले त्यांची मागणी काय आहे की ..............

**रोहिदास पाटील :-**

सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता, असे सगळे त्यांनी दाखवले.

**दिपक खांबित :-**

तुम्हीच विचारा. ज्यांचे ज्यांचे झाले ते इकडे बसलेले आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

तसे नाही साहेब. तुम्ही आता मोघे मॅडम यांना जो निकष देणार आहात. तो निकष ५३८ लोकांना लावावा. असा आमचा आग्रह आहे.

**दिपक खांबित :-**

त्याकरीता कोणाचा तरी निर्णय पाहिजे ना. या लोकांनी काय करायला पाहिजे?

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्यामुळे सविस्तर विषय पुढच्या मिटींगला आणा.

**दिपक खांबित :-**

उलट, हे बाईचे झाले ना. तर ह्या लोकांना जावून असे केले पाहिजे की, त्यांचे असे झालेले आहे तर, आमच पण करुन द्या. तर त्या बेसवर लगेच होईल. नाहीतर ह्यांचे पण होणार नाही.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये कसे झाले की, आता ह्यांचे कन्टेम्प्ट झाले. कारण स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयाची अंमलबजावणी आपण केलेली आहे. म्हणजे अर्धी अंमलबजावणी झालेली आहे आणि अर्धी अंमलबजावणी व्हायची आहे. १० लोक असो किंवा ५३८ लोक असो त्यांना प्रतिबंध आहे अशातला काही भाग नाही.

**दिपक खांबित :-**

पण, ते नियमाप्रमाणे कोर्टाने ह्यांनापण द्यावे आणि यांनी पण असा एक ॲप्लीकेशन करावे आणि त्याच्यावर पुढचा निर्णय घ्यायचा.

**रतन पाटील :-**

ठराव द्या.

**एस. ए. खान :-**

त्यावेळेला जो निर्णय घेणार असेल त्याचे त्यावेळेला मन कसे असेल ते आपण सांगु शकत नाही. जर, त्याने त्या वेळेला ॲप्लीकेशन रिजेक्ट केले तर प्रॉब्लम होईल. म्हणून मी बोलतो. पण तुम्ही मागचा दाखवणार का? आताचा निर्णय झाला ते मान्य करायला बंधनकारक नाही. तो म्हणणार मला पटत नाही. ५३८ लोकांना प्रॉब्लम होईल.

**दिपक खांबित :-**

त्यांनी कोर्टात केस करायची आणि नंतर मग, आपण वाटावाटी करायच्या.

**जयंत पाटील :-**

५३८ कर्मचाऱ्यांचा विषय पुढच्या सभेमध्ये घेवून या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खांबित साहेब, या मोघे बाईंना १९९७ पासून मागील फरक देणार आहोत. आज २००६ झाले. म्हणजे जवळजवळ नऊ वर्षे झाले तर नऊ वर्षाचे किती पैसे त्यांना आपल्याला द्यावे लागेल आणि आपल्यावर किती आर्थिक बोजा पडणार आहे. अंदाज किती आहे? २ लाख रु., ३ लाख रु., ४ लाख रु. साहेब, सांगायचा मुद्दा काय आहे की .........

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

हा जो निर्णय आहे ना, पहिल्या वेळेला असाच झालेला होता आणि ५३८ कर्मचा-यांनी बाब विचारात घेऊन आपण निर्णयाच्या तारखेपासून त्याची अंमलबजावणी केली होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझे म्हणणे असे आहे की, जर मोघे प्रकरणामुळे आपल्यावर एवढा बोजा पडला. तर ५३८ कर्मचा-यांचा आपल्यावर किती बोजा पडणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

ते आपल्याला काढावे लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणून त्यांच्यासाठी आपल्याला सुरुवात करुन देतो. जर आपण ह्यांना दिले तर आपल्याला ५३८ कर्मचा-यांना पण द्यावे लागेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

म्हणून आपण दिले नव्हते ना. आपण ह्यांना कोर्टाच्या निर्णयाच्या तारखेपासून अंमल केले होते. स्थायी समितीच्या मान्यतेने. आपण सर्वांना सारखा निर्णय केला होता.

**दिपक खांबित :-**

आपण तसा ठराव करु.

**शशिकांत भोईर :-**

कोर्टाचा अपमान केल्यासारखा होईल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

त्यांनी जर मान्य केले तर काही अडचण होणार नाही. त्यांना आपण सभागृहात बोलावून घेउया.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब, हे बोलण्यापेक्षा ह्या बाईच्या अगेन्स्ट केस अपिल करण्यास हरकत आहे का? ह्या निर्णयाच्या अगेन्स्ट आपल्याला अपिल करत येत नाही का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

या ५३८ कमर्चा-यांसोबत श्रीम. मोघेबाई होत्या. परंतु, श्रीम. मोघे बाईंचा त्याच्यामध्ये समावेश झालेला नाही. त्यांनी लेबर कोर्टात अपिल दावा दाखल केलेला होता. परंतु, ५३८ कामगार कायम झालेले नव्हते. त्या लेबर कोर्टात गेल्यानंतर लेबर कोर्टाने निर्णय घेतला की, २४० दिवस पूर्ण होतात. त्या दिवसापासून त्यांना कायमचे फायदे द्यावेत किंवा कायम करुन घ्यावेत. त्यांनी हा विषय मागच्या निर्णयानंतर स्थायी समितीसमोर सादर केला असता स्थायी समितीने त्याला मान्यता दिली. त्यांचा न्याय ज्या तारखेपासून झाला त्यांना त्या तारखेपासून कायम केले. कोर्टाचा अवमान झाला म्हणून प्रशासनाचा कन्टेम्प्ट दावा दाखल झालेला होता.

**जयंत पाटील :-**

आम्ही ५३८ कर्मचा-यांबाबत विचारत आहोत. तुम्ही आम्हाला श्रीम. मोघेबाई संदर्भात सांगत आहात. कोर्टाने त्यांना लिपिक पदावर घ्यावे असा आदेश दिलेला होता. कोर्ट आदेश कसे देउ शकते? अपले वकील काय करित होते? त्यांना लिपिक पद दिले तर ५३८ लोकांचे काय करणार? ते सफाई कमागार आहेत. तेसुध्दा लिपिक होउ शकतात. मग ते सफाई कामगारच राहणार का?

**रोहिदास पाटील :-**

५३८ कर्मचा-यांनी अनेक वर्षे अस्थायी स्वरुपात काम केलेले आहे. श्रीम. मोघे या काही वर्षे कलेक्टर ऑफिसमध्ये कार्यरत होत्या. नंतर त्या आमच्याकडे आलेल्या आहेत. आम्ही त्यांना विरोध करीत नाही. मग आपण ५३८ कर्मचा-यांना न्याय द्यायला मागे का पडतो? मा. आयुक्तसाहेब, स्थायी समितीचे सभापती, नगरसेवक, स्थायी समितीचे सदस्य त्यांना न्याय का देऊ शकत नाही? ५३८ कर्मचा-यांना जो नियमानुसार न्याय मिळायला पाहिजे. ते काम तुम्ही करायला पाहिजे.

**मा. आयुक्त सा़ो. :-**

स्थायी समितीच्या भावना लक्षात घेऊन मी स्थायी समितीला असे सांगू इच्छितो की हा विषय विषयपत्रिकेवर आलेला आहे. आपण या विषयाला मान्यता द्यावी. आपण हा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबत ५३८ कामगारांना महापालिकेने निर्णय घ्यायला पाहिजे. मी स्थायी समितीला असे सांगू इच्छितो की ५३८ कामगारांबाबत शासनाचा जो आदेश असेल तो आदेश आणि ५३८ कामगार जी साफसफाई करतात ते सगळे विचारात घेऊन दोन आठवड्यात निर्णय व्हावा. तिस-या स्थायी समितीला हा विषय आणतो आणि हा विषय विषयपत्रिकेवर घेतो. वाटल्यास याबाबत महासभेत चर्चा करुया. आपण महासभेचा ठराव शासनाकडे मंजूरीला पाठवून मंजूरी घेऊया.

**जयंत पाटील :-**

ते कर्मचारी कोर्टात जात नाहीत.

**मा. आयुक्त सा़ो. :-**

५३८ कर्मचा-यांना वाटले तर ते कोर्टात जाऊ शकतात.

**शशिकांत भोईर :-**

आपण त्यांच्या हितासाठी लढणे हे आपले कर्तव्य आहे.

**जयंत पाटील :-**

ते कर्मचारी कोणाच्या विरोधात कोर्टात जाणार आहेत?

**मा. आयुक्त साो. :-**

औद्योगिक न्यायालय किंवा लेबर कोर्ट कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायावर दाद मिळवण्यासाठी स्थापन केलेले आहे.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे सन १९९०-९१ पासूनचे कर्मचारी आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ते असे अगेन्स्ट जाऊ शकत नाहीत का?

**एस. ए. खान :-**

जाऊ शकतात.

**शशिकांत भोईर :-**

आज असा विषय झालेला आहे की महासभेला शिफारस करा. महासभा निर्णय घेईल. परंतु, हा विषय कोर्टात पाठवू नका.

**रतन पाटील :-**

५३८ कर्मचाऱ्यांना महासभा शिफारस देईल का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

महासभेत असे विषय घेतात.

**शशिकांत भोईर :-**

आपण महासभेला शिफारस करुया. तुम्ही हा ठराव त्याप्रमाणे करा. आपण ५३८ कामगारांसाठी काही निर्णय लावायचे आहेत.

**जयंत पाटील :-**

आपण सन २००० पासून ५३८ कामगारांना कायम म्हणून घेतलेले आहे. श्रीम. मोघेबाई यांना २४० दिवस भरल्यानंतर कायम करावे असे त्यांचे म्हणणे आहे.

**मा. आयुक्त साो. :-**

ते ५३८ कर्मचारी होते म्हणून ते कोर्टात गेलेले नाहीत. परंतु, त्यांनी औद्योगिक न्यायालयात जाऊ नये असे आमचे म्हणणे आहे. शासनाने ५३८ कामगारांबाबत निकष दिलेले आहेत. मागच्या स्थायी समितीला हा विषय घेतलेला होता. त्याची अंमलबजावणी केल्यानंतर हा मुद्दा पुन्हा उपस्थित झालेला आहे. ह्याच्यासाठी कन्टेम्प्ट ऑफ केस दाखल झालेले असल्यामुळे हा विषय पुन्हा आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

आपले काही सफाई कामगार होते. त्यांना पदोन्नती देऊन लिपिक म्हणुन नेमलेले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याला या विषयासाठी अपिल करता येत नाही.

**मा. आयुक्त साो. :-**

स्थायी समितीने निर्णय घेतल्यामुळे आपली जी अर्धी अंमलबजावणी राहिलेली आहे त्याच्यावर कन्टेम्प्ट चालू आहे.

**जयंत पाटील :-**

याबाबत विधी अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**मा. आयुक्त साो. :-**

तुम्ही याबाबत ठराव केलेला आहे आणि त्याची अंमलबजावणी झालेली आहे.

**जयंत पाटील :-**

आपण कन्टेम्प्ट केल्यानंतर कोर्टात गेल्यानंतर अपिलात जाऊ शकतो का?

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही याबाबतचे नियम सांगा. आपण न्याय मिळवून देतो. पण, नियम काय? ५३८ लोकांना नियमानूसार घ्यायचे की नाही. त्या कोर्टाचा आदेश घेवून. कोर्टाच्या आदेशानूसार घेवू शकतो की नाही. आपण एवढ उत्तर द्या. तुम्ही आम्हाला सल्ला द्या. जसे मोघे बाईनां कोर्टाने आदेश दिला. आपण कोर्टाच्या आदेशाचा आदर करतो. त्याच्याही पलिकडे जाउुन आपण मोघे बाईचाही आदर करतो. त्यांनी नोकरी केलेली आहे. त्यांना न्याय मिळावा त्यांच्याच बरोबरचे ५३८ कर्मचारी जे आहेत. त्यांच्या कोर्टाच्या आदेशाचा आधार घेउुन ही स्थायी समिती किंवा मा. महासभा हे ह्यांची अंमलबजावणी करु शकते की, नाही. साधे उत्तर द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, हे सांगतात की, आपण त्यांना घेवुन त्यांचा विचार करायला लागेल. त्यांचे बेनिफीट द्यायचे की, नाही ते सांगतिल त्याप्रमाणे आपल्याला द्यायचे आहे. मग, तेव्हा तुम्ही निर्णय घ्या. आपण महानगरपालिकेला कशाला खड्डयात टाकतो.

**जयंत पाटीलः-**

महानगरपालिकेला आपण खड्डयात टाकलेले नाही.

**मा. सभापती :-**

मोघे बाईंना बोलावून घ्या.

**जयंत पाटीलः-**

साहेब, तसे नाही. तसे चालेल का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

त्यावेळला सभागृहात अपिल करा. असे सांगितले असते तर त्यावेळेला किती गोंधळ झाला असता.

**गिता जैन :-**

साहेब, मग ५३८ कर्मचा-यांचे काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

त्यांनी तुमच्यापेक्षा जास्त कालावधी काम केलेले आहे. मॅडम, तुम्ही समजुन घ्या तुमची एक डेट भरायला लागली. त्यांची एक डेट भरायला लागली. आपण समोपचाराने. तुम्ही प्रमोशनसाठी किंवा साठी तो तुमची मुळ मागणी होती. त्याच्या बद्दल आपल्याला विचार करता येईल. रक्कम फार मोठी होईल ना. पण, त्यावेळेस निर्णय होवु शकला नाही. डेट बद्दल म्हटल तर चर्चा झाली नसती ते होत ते तेवढ आपण त्यावेळेला करुन घेतले त्यांचे म्हणणे की, मला पण का दिले नाही?

**जयंत पाटीलः-**

पण, केस तर प्रशासन पाठवतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

ह्याच्यापूर्वीच निर्णय झालेला होता.

**रतन पाटील :-**

साहेब, त्यावेळेला निर्णय झाला. मा. आयुक्त साहेबांनी निर्णय केला . मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, ज्या दिवसापासून निकाल लागला त्या दिवसापासून त्यांना मिळावे.

**मा. आयुक्त :-**

आपली जी मागणी होती. त्याचा कोर्टाने निर्णय घेतला की, कोर्टाच्या निर्णयाच्या तारखेपासून घ्या. असा स्थायी समितीने निर्णय घेतला.

**जयंत पाटीलः-**

मग, आता आपण अपिलात जावु या. तुम्ही सांगितले की ते असे करणार आहेत. आणि ते ऐकत नाही . आम्हाला ५३८ लोकांना नाही द्यायचे आहे? नगरपालिकेवर किती बोजा पडतो. ५३८ कर्मचारी जे आहेत ते आज इतकी वर्ष झाली काम करतात.

**रत्नप्रभा मोघे (लिपीक) :-**

माझा जो कोर्टाचा खर्च झालेला आहे. तो तुम्ही मला द्या.

**एस.ए.खान :-**

किती झाला ?

**मा. सभापती :-**

कोर्टाचा खर्च किती झालेला आहे? ठिक आहे मंजुर आहे. कोर्टाचे २५ हजार देतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तुम्ही मागच्या वेळेला तुम्ही मान्य केल्या नंतर आपण इथे ठराव करुन आदेश दिले होते. आणि तुम्ही कोर्टात गेला वास्तविक जायला नाही पाहिजे होते .

**रत्नप्रभा मोघे (लिपीक) :-**

परंतु, मला कोर्टात जावे लागले.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

असे कसे ऐकले नाही. तुम्हाला कायम केले नाही.

**रत्नप्रभा मोघे (लिपीक) :-**

मी तुम्हाला सगळ्यांना सांगितले होते. रिक्वेस्ट केली होती. की, माझा विषय परत परत घ्या .

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

कोणाला वैयक्तीक अधिकार नव्हते. एकदा सभागृहाने फायनल केल्यानंतर ते डेट कमी करून कोणाला देण्याचे अधिकार नव्हते तुमच्या हक्कासाठी तुम्ही गेला.

**रत्नप्रभा मोघे (लिपीक) :-**

साहेब, गेले म्हणून हा विषय पुन्हा आला ना. नाहीतर, मग आलाच नसता.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तुमची ऑर्डर काढली ना.

**रत्नप्रभा मोघे (लिपीक) :-**

माझा आतापर्यंत या केससाठी जो काही खर्च झालेला आहे. तेवढा खर्च मला देण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तुम्हाला कोर्टासाठी किती खर्च झालेला आहे ते सांगा?

**रत्नप्रभा मोघे (लिपीक) :-**

मला कोर्टासाठी रु. २५ हजार एवढा खर्च झालेला आहे.

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आम्ही तुम्हाला कोर्टासाठी झालेला खर्च देउ.

**मा. आयुक्त :-**

याठिकाणी सभागृहाच्या भावना लक्षात घेता तुम्ही तुम्हाला जेवढा कोर्टासाठी खर्च झालेला होता तो खर्च सांगितलेला आहे. त्याप्रमाणे तुमचा रु. २५ हजार इतका खर्च महापालिकेतर्फे दिला जाईल. जर सभागृह तुम्हाला अशी मान्यता देत असेल तर तुम्हाला मान्य आहे का?

**श्री. बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपल्याकडे ५३८ सफाई कामगार आहेत. तेसुध्दा अशीच मागणी करतील.

**रत्नप्रभा मोघे (लिपीक) :-**

त्यांनी अशी मागणी केली तरी तुम्ही त्या कामगारांना लिपिक पदावर कायम करण्याच्या अटी बघितल्या पाहिजेत.

**प्रकरण क्र. १०२ :-**

श्रीमती रत्नप्रभा मोघे, लिपीक यांना मा. औद्योगिक न्यायालय ठाणे यांचे आदेशानुसार नेमणुक देणे बाबत.

**ठराव क्र. १०४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्रीम. रत्नप्रभा मोघे यांची मा. स्थायी समिती सभा दि. २५/०१/२००६ ठराव क्र. २०४ च्या मंजुरीन्वये दि. ०८/११/२००५ पासून लिपिक या पदावर रु. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० नेमणूकीचे आदेश देण्यात आलेले आहेत. दि. ०८/११/२००५ रोजी मा. न्यायालय यांनी औद्योगिक न्यायालयातील दावा क्र. ८३/२००३ मध्ये श्रीम. रत्नप्रभा मोघे यांना २४० दिवस पुर्ण झाल्याच्या दिनांकापासुन म्हणजेच दि. १९/०५/९७ पासुन नेमण्याबाबत व तसेच श्रीम. रत्नप्रभा मोघे यांना कायम कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधा व मागील फरक देण्याबाबत निर्णय दिला होता. श्रीम. रत्नप्रभा मोघे यांना मा. न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर २४० दिवसांची सेवा पुर्ण झाल्या दिनांकापासुन नेमणुक न देता मा. औद्योगिक न्यायालयाचा निकाल लागल्यापासुन म्हणजे दि. ०८/११/०५ पासुन नविन कर्मचारी म्हणुन नेमणुक दिल्याने श्रीम. रत्नप्रभा मोघे यांनी मिर भाईंदर महानगरपालिकेच्या विरूद्ध पुन्हा न्यायालयात Criminal Complaint (ULP) NO/2006 दाखल केलेली आहे. प्रशासनाचा गोषवारा पाहता श्रीम. रत्नप्रभा मोघे यांना मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार २४० दिवस पुर्ण झाल्यापासुन नेमणुक देणेबाबत व तसेच कायम कर्मचारींना दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधा व मागील फरक म्हणजेच दि. १९/५/९७ पासुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्री.जयंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. १०३ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

सदर विषय आहे सिल्वर पार्क जलकुंभ आउटलेट एम.एस. इनलेट स्थलांतरीत करणे बाबत आहे. आपण तिकडे जी जागा पाहिली त्याचे नक्की लोकेशन काय? आपण जी बिल्डींग तिकडे बसवणार आहोत, ती बिल्डींग दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट करु शकत नाही का? याचा प्रशासनाने खुलासा करा. नाहीतर नकाशा आणा. टाकी कुठे आहे? आऊटलेट कुठे गेले? कारण याच्यावर आपण २५ लाख रु. खर्च करणार आहोत. तो

वेस्ट आहे ना. नाहीतर कारण आपण जी बिल्डींग बनवतो. तर त्या ठिकाणी बसवा ना. ह्याचा नकाशा करुन आणा. त्याचे काय आहे ते.

**रोहिदास पाटील :-**

आपण विषय पुढे घेतला. तर तुम्ही आम्हाला काय आश्वासन दिले.

**दिपक खांबित :-**

या बेसवर त्यांचे पण करायचे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला एक ठराव आठवतो का? २००५ सालचा हा ठराव त्या लोकांना ९३ पासूनचा फरक द्यावा त्या ठरावाची आपण अंमलबजावणी काय केली? ५३८ कर्मचारी काही लिपिक आहेत. काही सफाई कामगार आहेत.

**मा. सभापती :**

तो विषय आपण घेवूया ना.

**रतन पाटील :-**

तो स्पेशल विषय आहे. आता आपल्याला बोलून ठराव मांडू शकत नाही. बोलू शकत नाही. डिसीजन घेऊ शकत नाही.

**मा. सभापती :-**

हा विषय आपण तिसऱ्या मिटींगला घेऊ या.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, जलकुंभाचे आऊटलेट व एम.एस. इनलेट स्थलांतरीत करण्याबाबतचा जो विषय आहे. तर, त्या ठिकाणी आपण अग्निशमन दलाची बिल्डींग, इमारत करणार आहोत. ज्या ठिकाणी आपण लोकेशन दर्शविलेले आहे. तिथे बिल्डींग बनवायची आहे. ते लोकेशन आपण हलवू शकत नाही का? २४ लाख ९८ हजार ४७७ रुपये खर्च आहे. तो आपण वापरु शकतो. तर प्रशासनाने त्याची माहिती द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. सदर जागेवर अग्निशमन दलाची इमारत बसत नाही. यावर प्रत्यक्ष बांधकाम विभाग, अग्निशमन दल, पाणी पुरवठा विभाग, सर्वांनी व्हिजीट केलेली तरी संपूर्ण इमारत बसत नाही. अगदी लास्ट पर्याय म्हणून शिफ्ट केल्याशिवाय पर्याय नाही. त्यावेळेस हा विषय घेतलेला होता. सर्व पर्याय बघितले. तिथे बिल्डींग बसत नाही. त्यामुळे पाईप लाईन शिफ्ट करणे हे अत्यंत गरजेचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

कितीची बिल्डींग बांधणार आहात? आपण २५ लाख रु खर्च करतो. कारण नसताना.......

**एस. ए. खान :-**

जागी बदली कशी करता येईल? जागा बदली करता येणार नाही. इनलेट, आऊटलेट का कुछ प्रॉब्लम है।

**शिवाजी बारकुंड :-**

माहिती देतो. निर्णय मा. स्थायी समितीने द्यावा. त्याबाबत बांधकाम विभागाने, अग्निशमन विभागासाठी मा. महासभेमधुन निविदा काढून तिथे ऑफिस आणि बिल्डींगसाठी प्रपोजल पास झालेला आहे. त्याच्यानंतर आमच्याकडे त्यांनी विचारणा केली. नंतर पायलिंगचे काम चालू झाले. तर त्याच्यामध्ये इनलेट आणि आऊटलेटचे पाईप येतात. तर पाईपलाईनवर कुठले स्ट्रक्चर नसु नये. म्हणून त्याची आम्ही पाहणी केली. बांधकाम विभाग आमच्याबरोबर आले. अग्निशमन विभागाचे अधिकारी आले आणि बिल्डींगचे मोजमाप घेतले असता तिचे पाईपलाईन शिफ्ट केल्याशिवाय बिल्डींग बसू शकत नाही. हा इथे पर्याय आहे आणि शिफ्ट केली तरच बिल्डींग होवू शकते.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे आता कितीची बिल्डींग बसते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की, पहिली गोष्ट म्हणजे त्या बिल्डींगचे प्रपोसिटी आहे ना. म्हणजे लोकांनी बघितले काय? बांधकाम विभागाने किंवा अग्निशमन विभागाने बघितला काय? प्लॅन सॅग्शन कसा झाला? ती बिल्डींग बसवली कशी? त्यांनी आधी पाईपलाईन होती की नाही ही पाहणी केली होती की नाही? तिथे बिल्डींग बसलीच नाही पाहिजे होती. त्या लोकांना प्लॅन पास केला. टेंडर काढले. तेव्हा पण त्यांना माहित नाही पडले की खाली पाईप लाईन आहे. हे काम कोणाचे आहे.

**दिपक खांबित :-**

सिल्वरपार्क आणि नवघर रोडला आहे. तिथे दोन पाण्याच्या टाकी आहेत. तशा दोन्ही ठिकाणी घेतलेले आहे. अग्निशमन केंद्रासहित आपल्या पाण्याच्या टाक्या तिकडेच आहेत. जागा पण आपल्याला तिकडे उपलब्ध आहे. अग्निशमन केंद्र हे तिकडेच पाहिजे. पाण्याचीटाकी साहेब, जवळ पाहिजे. असे पाहिजे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्हाला फायर ब्रिगेडची किती स्टेशन दाखवू. वाशी न्यु बॉम्बे, ठाणा, मुंबई तिथे पाण्याची टाकी नाही.

**दिपक खांबित :-**

सदर ठिकाणची जागा ही आपण मा. उपमहापौर यांनी सगळ्यांनी जागा डिसाईड केलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब असे आहे, मी मागे म्हटले होते की, कुठल्याही डिपार्टमेन्टचे कुठल्याही विभागाशी कॉ-ऑपरेशन नाही. जर, दोघांची संगनमत असते तर बांधकाम विभागाने किंवा अग्निशमन विभागाने पाणी विभागाला विचारायला पाहिजे होते की, आम्हाला इथे बिल्डींग बसवायची आहे. तुमचे इथे खाली पाईपलाईन, इनलाईन, आउटलाईन आहे की नाही तर त्यांनी सांगितले असते की, इथे इनलेट आहे. तेव्हा हा निर्णय आला असता.

**शिवाजी बारकुंड :-**

पाणि पुरवठा विभागाने ह्याच्या अगोदरचे जे अधिकारी होते त्यांनी, ह्या ठिकाणी अग्निशमन इमारत उभारण्यासाठी ना हरकत दाखला दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्या अधिकाऱ्याचे नाव सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. दशोरे साहेब,..........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्या अधिकाऱ्यांवर ॲक्शन झाली पाहिजे. तुम्ही मला पहिले सांगा की, तो कार्यकारी अभियंता दशोरे साहेब यांनी परवानगी दिली कशी? त्यांना इनलेट, आउटलेट माहित नाही. खाली पाईपलाईन आहे. तर, त्यांनी परवानगी दिली कशी?

**एस. ए. खान :-**

साईडला दिली होती. आणि आता पुढे आले असे काय आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

शासनाचे इनलेट, आउटलेटचे पाईपलाईन आहे. तिथे फायर स्टेशन करायचे आहे. त्याच्यासाठी पर्यायाने ते पाईपलाईन सुरु करायलाच लागेल.

**एस. ए. खान :-**

फायर स्टेशन तिकडे ऑलरेडी प्रपोज केलेले आहे का?

**दिपक खांबित :-**

बांधायचे

**एस. ए. खान :-**

बांधायचे आहे ना.

**दिपक खांबित :-**

तुम्ही समर्थन कराल तर.

**एस. ए. खान :-**

तुम्हाला समर्थन करतो ना.

**दिपक खांबित :-**

याबाबतीत मा. उपमहापौर......

**एस. ए. खान :-**

फायर स्टेशन तिथे झालेच पाहिजे. आपल्याकडून चुक झालेली आहे. तर सरकुन करुन टाकायचे जे झालेले आहे ते काय करणार. पहिले दशोरे साहेबांनी चुकी केलेली आहे. फायर स्टेशन होणे तिचे गरजेचे आहे.

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण १०३ च्या ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

हा ठराव बहुमताने मंजुर.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण तुम्ही पर्याय सुचवा ना की, काय केले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

पर्याय सुद्धा तुमच्या अधिकारात आहे का?

**एस. ए. खान :-**

पास झाले. सगळे सॅक्शन झाले. हा प्लान अप्रुव्ह झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापालिकेच्या एम. जी. पी. चा अर्ज असु द्या. आम्हाला कुठे दाखवले. आम्ही हे २५ लाख रुपये देत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे. पण, तुम्ही पर्याय सुचवाना की, काय केले पाहिजे?

**एस. ए. खान :-**

तिथे एवढी अडीच लाख ची वस्ती झालेली आहे. तिथे फायर ब्रिगेडचे स्टेशन कंम्पलसरी आहे.

**जयंत पाटील :-**

फायर स्टेशन झाले नाही.

**प्रकरण क्र. १०३:-**

आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १०५ :-**

सिल्व्हर पार्क जलकुंभाचे आउटलेट (Outlet) व एम एस इनलेट (Intlet) स्थलांतरीत करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सिल्व्हरपार्क जलकुंभ या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत अग्निशमन विभागाचे ऑफिस तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सदरच्या बांधकामाच्या लेआउटमध्ये सिल्व्हरपार्क जलकुंभाचे आउटलेट व इनलेट येत असल्याने सदरच्या बांधकामाच्या पायाचे (Footing) काम चालू करता येत नाही. त्यासाठी वरील जलकुंभाचे आउटलेट व इनलेट लेआउटच्या बाहेर स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. उपरोक्त कामाचे प्राकलन तयार करण्यात आलेले असुन या कामाकरीता रू. २४,९८,४७७/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त कामाकरीता येणाऱ्या खर्चाची तरतुद महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या वार्षिक अर्थसंकल्पात ''नविन जलवाहिनी टाकणे'' (तरतुद रू. ६००.०० लक्ष) या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेली आहे. सबब सदर कामाच्या प्राकलनानुसार येणाऱ्या खर्चास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १०४ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

आपण मंथरा टेक्नोलॉजीचे ठरावानुसार नाव दिलेल आहे. आणि त्यांच्याजवळ कागदपत्र नाही. मा. सभापती साहेबांना विनंती आहे की, आपण ह्या गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे. पंचिग मशीन आणि त्यानुसार आवश्यक साहित्य व ३००० नग येणाऱ्या खर्चाच मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे. म्हणजे आपल्या कर्मचाऱ्यांसाठी देत आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

एका कर्मचाऱ्याला दोन कार्ड, एक कार्ड रिझर्व व एक कार्ड तो गळ्यात टाकण्यासाठी दिलेला जर उद्या भविष्यात ते कार्ड मिस झाले तर आपण ड्यूप्लीकेट मध्ये देतो.

**शशिकांत भोईर :-**

आपल्या इथे कर्मचारी किती आहे? दोन,तीन की दिड हजार कर्मचारी आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

दिड हजार.

**शशिकांत भोईर :-**

मग, क्लास १, क्लास २ या सर्वासाठी

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

हो सर्वांसाठी.

**शशिकांत भोईर :-**

आता, सात मशीन आहे तर त्या आपण कुठे कुठे लावणार आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

सर्व प्रभाग कार्यालय आणि मुख्य कार्यालय.

**शशिकांत भोईर :-**

आणि काही सफाई कामगार आहे. त्यांच्यात काही मुकादम आहे तर ते कुठे कार्ड पंचिग करतील.

**एस. ए. खान :-**

ते प्रभाग कार्यालयात पंचिंग करतील ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

त्या लोकेशनप्रमाणे आपण......

**शशिकांत भोईर :-**

मग, आपल्याला मशीन वाढवायला लागतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

आवश्यकता असेल तर वाढवता येईल.

**शशिकांत भोईर :-**

आमच्या तिथे एक मुकादम आहे....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त(मु.)सो.) :-**

तुमचा मुद्दा लक्षात आला. जिथे सफाई चे बुथ आहे. तिथे आवश्यकता पडली तर आपण वाढवून घेवू.

**शशिकांत भोईर :-**

तसे करता येईल तर वाढवाच.

**प्रकरण क्र. १०४ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेला मंजुरी देणे. (भांडार विभाग)

**ठराव क्र. १०६ :-**

महानगरपालिकेने दि. २९/०६/२००६ रोजी ''आपला वार्ताहर'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार पंचिंग मशिन खरेदी करणेकामी खलील ठेकेदारांनी निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. दिव्या इलेक्ट्रोटेक्नीका प्रा. लि. | मे. कमल इंजिनिअरिंग वर्क्स | मे.पी.२ कार्ड सिस्टम | मे. भरत जैन | मे. मंथरा टेक्नोलॉजी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संगणीकृत हजेरी सिस्टम बोटाच्या ठश्याशी मॅच करून बयोमट्रीक सेल्सरसह | रु. ९१,८५३/- प्र. न. | रु. १,२९,७८०/- प्र.न. | रु. १,१३,५५८/- प्र.न. | रु. ५४,७५०/- प्र.न. | रु. ४३,९५०/- प्र.न. |
| २. | कॉम्प्युटर प्रोग्राम | रु. ४२,८४८/- प्र.न. | रु. ६९,६२८/- प्र.न. | रु. ५३,२६०/- प्र.न. | रु. ५०००/- प्र.न. | रु. १९,९००/- प्र.न. |
| ३. | केबल | रु. १२२/- प्र.न. | रु. १४५/- प्र.न. | रु. १३८/- प्र.न. | रु. ३३.५०/- प्र.न. | रु. ३५/- प्र.न. |
| ४. | कॉन्टॅक्टलेस स्मार्ट कार्ड | रु. २०३/- प्र.न. | रु. २३२/- प्र.न. | रु. २०९/- प्र.न. | रु. ९३/- प्र.न. | रु. ९९/- प्र.न. |
| ५. | कन्व्हर्टस | रु. ९,८५०/- प्र.न. | रु. १०,४२९/- प्र.न. | रु. १०,१९७/- प्र.न. | रु. ६,५००/- प्र.न. | रु. ६,२८०/- प्र.न. |

वरील प्राप्त निविदा दि. १३/०४/२००६ रोजी उघडण्यात आलेल्या आहेत. सदरच्या निविदा मुळ उत्पादक कंपनी यांच्याकडून मागविण्यात आलेल्या होत्या. सादर केलेल्या निविदेतील दर आणि पुरवठा करण्यात येणाऱ्या मशिनच्या अनुशंगाने आवश्यक कागदपत्रे व पुर्व अनुभव याबाबतची कागदपत्रे पडताळणीसाठी संबंधितांना लेखी पत्र देउन दि. ३/०५/०६ रोजी बोलविण्यात आले होते. सदर बैठकीत सर्वात कमी दराची निविदा धारक मे. भरत जैन यांचे मुळ उत्पादक नसल्याचे खात्री करण्यात येउन दुसरी सर्वात कमी दाची निविदा मे. मंथरा टेक्नोलॉजी यांच्याबाबत विचार केला असता यांच्याकडे आवश्यक त्या कामाचा पुरेसा अनुभव नसल्यामुळे सदरची निविदा विचारात घेता येत नाही. त्यामुळे तीसऱ्या सर्वात कमी दराची निविदा मे. दिव्या इलेक्ट्रोटेक्नीका प्रा. लि. यांची निविदा विचारात घेणे योग्य राहील. त्यांनी निविदेसोबत कामाचा अनुभव खुप मोठ्या प्रमाणात असल्याची यादी जोडली आहे. सदर मशिनचे ते मुळ उत्पादक आहे.

तरी मे. दिव्या इलेक्ट्रोटेक्नीका प्रा. लि. यांची निविदा स्विकारण्यास शिफारस असे तसेच ७ पंचिंग मशीन आणि त्यानुसार आवश्यक साहित्य व ३००० नग कॉन्टॅक्टलेस स्मार्ट कार्ड खरेदीकामी येणाऱ्या खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीने मंजुरी देण्यात आली आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदन :- सौ. जेन्वी आल्मेडा**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. १०५च्या ठरावाचे वाचन केले.)

**जेन्वी आल्मेडा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्याबद्दल एक शंका आहे की, मंथरा टेक्नॉलॉजी जी आहे. त्याच्यामध्ये ४३,९५०/- प्रति नग आहे आणि दिव्या इलेक्ट्रॉनिक आहे ह्याचे ९१,८५३ आहे म्हणजे डबल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मंथरा म्हणजे आपल्याकडे वेगवेगळे काम करतात. त्यांनी को-या कागदावर भाव टाकले होते आपण उत्पादकाकडून मागवले होते. आणि ही एजन्सी जवळपास बृहन्मुंबई, रिलायन्स मोठमोठ्या कंपनीकडे १४६ लोकांकडे काम केलेले आहे. त्यांचे स्वतःचे होम प्रोडक्ट आहे. त्यांना ज्यावेळेला चर्चेला बोलावले होते. त्यांच्याकडे काहीच रजिस्ट्रेशन नाही. काही नाही. आणि बृहन्मुंबई महापालिका, टाटा ग्रुप, बिरला ग्रुप, एल. ॲन्ड टी., वोल्टास, गोदरेज, किर्लोसकर, हिंदुस्थान मोटार, टाईम्स ऑफ इंडीया ग्रुप, बॉम्बे हॉस्पीटल, लीलावती हॉस्पीटल चहुकडुन ह्यांनी हे काम केलेले आहे. म्हणून आपण शेवटी ह्याला फायनल केले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये असे आहे. आपण गाड्या खरेदी करतो. पण आपण मागे गाड्या खरेदी करण्याचा विषय पास केला होता. मा. महापौर मॅडम, कमिशनरसाहेब, स्थायी समितीचे सभापती ह्यांना गाड्या देण्याचा ठराव पास केला होता. त्याच्यामध्ये काय झाले? किती गाड्या आल्या?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आल्या सर्व गाड्या आल्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मग ह्यांची गाडी का आली नाही. मा. सभापती साहेबांची गाडी का नाही आली मा. सभापती साहेबांची गाडी कुठे आहे? ह्यांनी जुनी गाडी वापरली. मग नविन गाडी गेली कुठे? साहेब, असे नाही. मा. सभापती साहेबांना नविन गाडी भेटली पाहिजे. आता ह्यांनी काही बघितले नाही. त्यादिवशी साहेबांची गाडी खराब झाली. आम्हाला अगदी धक्का मारावा लागला.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आमच्याकडे आपण केलेल्या सुचनेप्रमाणे सभापती महोदयांची वाहनाची व्यवस्था करून देवू. काही अडचण नाही होणार.

**जयंत पाटील :-**

साहेब, त्यांचा प्रश्न वाहनाची व्यवस्थेचा नाही.

**जेन्वी आल्मेडा :-**

साहेब, करू म्हणजे लवकर करा.

**जयंत पाटील :-**

ही गाडी किती वर्षाची जुनी आहे. आपण ती गाडी सेकंड हँडमध्ये घेतली होती. आपण जी गाडी नविन घेतो. आमच्याकडे गाड्या आहेत किती वर्षाने धक्का मारायला लागला पाहिजे. एकतर तुम्ही गाड्यांचे सर्व्हिसिंग वगैरे व्यवस्थित करत नाही. मेंन्टेन करत नसणार.

**मा. सभापती :-**

त्याचे चार टायर गेले.

**जयंत पाटील :-**

आपले रस्ते एवढे निश्चित खराब नाही.

**प्रकरण क्र. १०५ :-**

मा. आयुक्त सोा. यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (वाहन विभाग)

**ठराव क्र. १०७ :-**

महानगरपालिकेने दि. ८/०६/२००६ रोजी दै. वृत्तमानस व दै. मुंबई संध्या या वृत्तपत्रास जाहिर केलेल्या निविदा सुचनेनुसार महापालिकेने खरेदी केलेल्या टाटा मॉडेल एस.एफ.सी ४०७ या चेचीवर शववाहिनीकरीता बॉडी बांधणेकामी खालील ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केल्या होत्या.

| अ.क्र. | तपशिल | निकालस मोटर इंडस्ट्रीज | सॅनसी मोटर्स | मर्क्युरी मोटर्स |
|---|---|---|---|---|
| १. | महानगरपालिकेने खरेदी केलेल्या टाटा मॉडेल एसएफसी ४०७ या चेसिसवर शववाहिनीकरिता बॉडी बांधणे, तसेच इन्सुलेटेड कोल्ड बॉक्स P.U.F. बसविणे | रु. ४,५२,०००/- | रु. ४,३८,०००/- | रु. ४,२५,०००/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता निविदेतील मे. मर्क्युरी मोटर्स यांचे दर सर्वात कमी आहेत. परंतु सदरचे दर हे अवाजवी असल्याने मे. मर्क्युरी मोटर्स यांना इकडील पत्र क्र. मनपा/वाहन/१५४/२००६-०७ दि. १०/७/२००६ अन्वये दि. ११/०७/२००६ रोजी वाटाघाटाकरीता बोलाविले असता वाटाघाटीअंती मे. मर्क्युरी मोटर्स यांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | वाटाघाटापुर्वीचे दर | वाटाघाटानंतरचे दर |
|---|---|---|---|
| १. | महानगरपालिकेने खरेदी केलेल्या टाटा मॉडेल एसएफसी ४०७ या चेसिसवर शववाहिनीकरिता बॉडी बांधणे, तसेच इन्सुलेटेड कोल्ड बॉक्स P.U.F. बसविणे | रु. ४,२५,०००/- | रु. ४,१०,०००/- |

वरीलप्रमाणे वाटाघाटीअंती मे. मर्क्युरी मोटर्स यांनी सादर केलेले दर मंजुर करणेत येत आहेत. तसेच सदर निविदा मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने स्विकारण्यात आलेली आहे. तरी या कामी येणारे देयक अदा करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (ड) अन्वये स्थायी सभा मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. रतन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उप-आयुक्त साहेब, अजिज शेख साहेब, यांच्या मातोश्रींचे निधन झाले. तर आपण श्रध्दांजली वहावी.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आरोग्य विभागाचे सन्मा. उपायुक्त श्री. अजिज शेख साहेब, यांच्या मातोश्री या देवाज्ञा झालेल्या आहेत. तर मी सभागृहाला विनंती करतो की, आपण शोक प्रस्ताव म्हणून दोन मिनिट स्तब्ध राहु.

**दु:खवटा ठराव :-**

आरोग्य विभागाचे सन्मा. उपायुक्त श्री. अजिज शेख साहेब, यांच्या मातोश्री ह्यांचे निधन झालेले आहे. त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दु:खात ही सभा सहभागी असून त्यांच्या मृतात्म्यांस चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रध्दांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. रतन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली असताना आपल्या सर्वांचे धन्यवाद करतो व सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी २.२० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**